
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२६

संपादकीय

वाचनालय असावे तर असे...

माझ्या अलीकडच्या विदेश प्रवासात मला फिनलंडची राजधानी हेलसिंकी या शहरातील एका आगळ्यावेगळ्या वाचनालयाला भेट देण्याची संधी मिळाली. या वाचनालयाचे नाव ऊडी (Oodi) असे आहे. वाचनालयाचे नाव काय असावे यासाठी लोकांकडून मते मागविण्यात आली होती. फिनलंडवर अनेक वर्षे स्वीडनचे आणि रशियाचे राज्य होते. त्या जोखडातून ते ६ डिसेंबर १९१७ रोजी मुक्त झाले. या घटनेला २०१७ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्याची शंभरी साजरी करण्यासाठी त्यांनी नवीन वाचनालय उभे करायचे ठरविले. ही इमारत आज एक प्रेक्षणीय स्थळ झाले आहे. देश-विदेशांतील अनेक पर्यटक या वाचनालयाला आवर्जून भेट देतात. दुरून इमारतीकडे पाहिले की, एखादी बोट उभी करून ठेवली आहे असा भास होतो. विशेष हे की, केवळ दोन ठिकाणी आधार देऊन ही महाकाय इमारत उभी ठेवली आहे. वाचनालय निर्माण करायचे असा निर्णय झाल्यानंतर इमारतीचा आराखडा तयार करण्यासाठी २०१२ मध्ये एक स्पर्धा घेण्यात आली. त्यातील उत्कृष्ट आराखड्याची निवड करण्यात आली. त्या स्पर्धेत 'ए ल ए आर्किटेक्ट' (ALA Architect) या गटाने बाजी मारली. त्यांनी दिलेले डिझाईन वापरून इमारत बांधण्यात आली आहे. २०१५ मध्ये कामाला सुरुवात होऊन २०१८ मध्ये ही इमारत पूर्ण झाली. ५ डिसेंबर २०१८ रोजी या वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.

वाचनालयाच्या तळमजल्यावर आपण जेव्हा प्रवेश करतो तेव्हा अनेक गोष्टी आपल्या नजरेस पडतात. डाव्या बाजूला एक मोठे भोजनालय आहे. तिथे अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ उपलब्ध असतात. जवळच थोडीशी मोकळी जागा आहे. ती प्रदर्शनासाठी राखून ठेवलेली आहे. मी ज्या दिवशी वाचनालयात गेलो त्या दिवशी तिथे फुलांचे प्रदर्शन भरले होते. 'हेलसिंकी स्टडी ग्रुप' (Helsinki Study Group) या संघटनेने तिथे एका कृतीसत्राचे आयोजन केले होते. या कृतीसत्रात फुलांची आकर्षक रचना कशी करावी हे शिकविण्यात आले होते. त्या कृतीसत्रात निर्माण केलेल्या काही रचना तिथे प्रदर्शित करण्यात आल्या होत्या. त्या खूपच आकर्षक होत्या. तळमजल्याच्या उजव्या बाजूला बैठ्या खेळांची सुविधा आहे. तिथे मोठ्या संख्येने लोक बुद्धीबळ खेळताना दिसतात. शेजारीच एक आडोसा तयार करून तिथे एक मोठा एलईडी पडदा लावला आहे. या पडद्यावर युरोपियन युनियनची सतत माहिती दिली जाते. या

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

युनियनची स्थापना कधी झाली, यात कोणकोणते देश आहेत, युरोपियन युनियनची पार्लमेंट कुठे आहे, तिचे कार्य कसे चालते याची माहिती सतत देत असतात. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, स्थापनेपासून आत्तापर्यंत या युनियनने काय साधले आहे, या युनियन पुढे कोणती आव्हाने आहेत, त्यावर मात करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत याची देखील माहिती या चित्रपटात दिलेली आहे.

सरकता जिना घेऊन आपण वर गेलो की अनेक गोष्टी आपल्याला पाहायला मिळतात. बसून काम करायचे असेल तर त्यासाठी इथे अनेक प्रकारच्या सुविधा पुरविल्या आहेत. वर्तुळाकार लाकडी बाके आपल्याला सर्वत्र दिसतात. याखेरीज या मजल्यावर विविध प्रकारच्या खुर्च्या ठेवल्या आहेत. एखाद्या व्यक्तीला संगणकावर काम करायचे असेल तर त्यांच्यासाठी संगणक ठेवले आहेत. एखाद्या व्यक्तीला रंगीत चित्र छापून घ्यायचे असेल तर त्यांच्यासाठी रंगीत छपाई यंत्र उपलब्ध करून दिले आहे. एवढेच नव्हे तर, त्रिमितीय वस्तू निर्माण करण्यासाठी 'थ्री डी प्रिंटर'ची व्यवस्था केलेली आहे. विशेष हे की, या मजल्यावर शिवणकाम करण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यासाठी अत्याधुनिक शिवणयंत्रे ठेवलेली आहेत. आपल्याला जे करायचे असेल ते तुम्ही करू शकता. कामांत अडचण आली तर मार्गदर्शन करण्यासाठी तिथे तज्ज्ञ मंडळी उपलब्ध आहेत. इथे असलेल्या यंत्रांचा वापर करून निर्माण केलेल्या अनेक वस्तू तिथे ठेवलेल्या आहेत.

मधल्या मजल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, मीटिंग रूम आणि स्टुडिओ. एखाद्या गटाला चर्चा करायची असेल तर त्यांच्यासाठी लहान-मोठ्या आकाराच्या खोल्या उपलब्ध करून दिल्या आहेत. या खोल्यांमध्ये मोठे टेबल, त्याच्या भोवती बसण्यासाठी खुर्च्या, संगणक, प्रोजेक्टर आणि पडदा एवढ्या सुविधा पुरविल्या आहेत. एखाद्या गटाला या खोल्या वापरायच्या असतील तर त्याचे आगाऊ आरक्षण करावे लागते. तसेच स्टुडिओचे देखील आहे. तुम्हाला दृकश्राव्य माध्यमात काही काम करायचे असेल तर तुम्ही स्टुडिओचे आरक्षण करू शकता. तिथे अनेक प्रकारची यंत्रे ठेवलेली आहेत. याखेरीज तिथे काम करणारे तज्ज्ञ आपल्याला मदत करायला तयार असतात.

सरकता जिना घेऊन आपण वरच्या मजल्यावर गेलो की, तिथे आपल्याला भव्य असे ग्रंथालय पाहायला मिळते. या ग्रंथालयात विविध विषयांवरील वेगवेगळ्या भाषांमध्ये लिहिलेले ग्रंथ उपलब्ध करून दिले आहेत. या सगळ्या ग्रंथांची वर्गवारी करून ते वेगवेगळ्या खणांत पद्धतशीरपणे लावून ठेवलेले आहेत. कोणत्या कप्प्यात कोणत्या विषयावरचे पुस्तक आहे याची स्पष्ट माहिती दिलेली आहे. त्यामुळे आपल्याला हवे ते पुस्तक शोधणे सहज शक्य होते. आपल्याला पाहिजे ते पुस्तक घेऊन आपण तिथे बसून वाचू शकतो. बसण्यासाठी पुरेशी आणि चांगली व्यवस्था केलेली आहे. वाचायला सोयीचे व्हावे यासाठी पुरेसा प्रकाश येईल याची व्यवस्था करण्यात आली आहे. पुस्तक घरी न्यायचे असेल तर मात्र वाचनालयाचे सभासदत्व घ्यावे लागते. वाचनालयाचे एक वैशिष्ट्य असे की, त्यात लहान मुलांसाठी एक वेगळा विभाग आहे. त्याची रचनाच वेगळी आहे. तिथे मुलांना खेळायला मिळते. त्याचबरोबर त्यांना आवडेल ते पुस्तक वाचायला मिळते. विशेष हे की, पालक मोठ्या संख्येने आपल्या मुलांना घेऊन इथे येतात. त्यामुळे या विभागात सतत वर्दळ असते.

(पृष्ठ क्र. १० वर)



व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२६

संपादक
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३१ वे/अंक ३ रा)

कार्यालय/पत्रव्यवहार
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org
vpmt1935@gmail.com

मुद्रणस्थळ :
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ९१५२४८७७६५
Email:perfectprints@gmail.com

अनुक्रमणिका

१)	संपादकीय	डॉ. सुधाकर आगरकर	
२)	जागतिक वारसा स्थळ : नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले जिंजी	श्री. दिलीप वंडलकर	२
३)	मागे वळून पाहताना (भाग – १)	सौ. कालिंदी कोल्हटकर	६
४)	भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या	प्रा. विजय यंगलवार	११
५)	परिसर वार्ता	संकलित	१७

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
किल्ले जिंजी

(यूनेस्कोने नुकत्याच 'मराठा मिलिटरी लॅंडस्केप' या विषयाअंतर्गत महाराष्ट्रातील अकरा आणि तमिळनाडूतील जिंजी हा एक किल्ला अशा एकूण बारा दुर्गांना जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केले आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. प्रस्तुत लेखात जिंजी या किल्ल्याची माहिती दिली आहे.- संपादक)

किल्ले जिंजी



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक रायगडावर दिनांक ६ जून १७७४ (ज्येष्ठ शुद्ध द्वादशी) मोठ्या थाटामाटात पार पडला. मधल्या दोन-तीन वर्षांच्या काळात राजांनी कुतूबशाहीशी सख्य धरले. त्यातून दोघांनी मिळून कर्नाटक मोहिमेची योजना आखली. १६७६ च्या दसऱ्याच्या मुहूर्ताला (६ ऑक्टोबर १६७६) राजांनी कर्नाटक मोहिमेसाठी रायगडावरून प्रस्थान केले. नेहमीप्रमाणे ही खडी मोहीम नव्हती. राजांनी छत्रपतीपदाला साजेसा डौल आखला होता. राजांची छावणी, डेरे, शामियाने, राहुट्यांनी सजली; तर फौज पोषाख, अलंकार, निशाणे यांनी समृद्ध होती. अश्वदळाच्या रुबाबात कमतरता नव्हती. याखेरीज जरीपटका-नगारे-नौबती यांसाठी उंचपुरे सुलक्षणी, मोजके हत्ती निवडले होते.



किल्ले जिंजीचा दरबार आणि मागे राजगिरीचा बालेकिल्ला

भागानगरच्या वेशीवर कुतूबशाही वजीर माकण्णा व त्यांचे बंधू आकण्णा यांनी पातशहातर्फे छत्रपती व इतर मान्यवरांचे स्वागत करून, त्या सर्वांना इतमानाने आपल्या समवेत घेत गोवळकोंड्याकडे प्रस्थान केले (दिनांक ४ मार्च १६७७). कुतूबशहाकडे सुमारे महिनाभर पाहुणचार झोडल्यानंतर राजांनी मद्रासकडे कूच केले. वाटेत त्यांनी मल्लिकार्जुनाचे दर्शन घेतले. थोडाफार दानधर्म केला, कृष्णा नदी ओलांडली आणि मद्रासच्या अलीकडे चार कोसावर असलेल्या आत्मकूर गावी छावणी थाटली. यावेळी कुतूबशाही सरदार मिर्झा महंमद अमीन त्याची पंचवीर हजार फौज आणि तोफखान्यासह राजांसोबत मोहिमेवर होता. एकीकडे राजांनी त्याला वेल्लोरच्या गडास वेढा देण्यास पाठवले, तर दुसरीकडे शिवबांनी त्यांचे एक हजार स्वार जिंजीकडे रवाना केले. मराठ्यांच्या

अधिकाऱ्यांनी किल्लेदार नासिर मुहंमदची भेट घेतली आणि शिवाजीराजे मागाहून येत असल्याची बातमी दिली. नासिर घाबरला, दिवस होता १३ मे १६७७. नासिरला कळून चुकले होते की, बदलत्या विजापूरच्या राजकारणात आज ना उद्या विजापूरचा दक्षिणेतील वालीगोंडापूरमचा पठाणी सुभेदार शेरखान हा किल्ला बळकावलेच. तेव्हा पन्नास हजार होन नगद आणि एक लक्ष उत्पन्नाच्या प्रदेशाच्या मोबदल्यात त्याने राजांसोबत तह मुकर्रर केला व किल्ला सोडण्यास तयार झाला. नासिर मुहम्मद हा विजापूरचा जुना वजीर खवासखानाचा पुतण्या होता. त्याला शिवबाराजे आणि काका खवासखानामध्ये असलेले सख्य चांगलेच ठाऊक होते. विजापूरचा नवीन वजीर बहलोलखान याचा पठाण पक्ष आणि खवासखानाचा दक्षिण पक्ष यांच्यात जोरदार वितुष्ट निर्माण झाले होते. मधल्या काळात खवासखानाचा खून घडवण्यात आला होता. त्यामुळे विजापूर दरबारात नासिरचा कुणीच वाली उरला नव्हता. याचाच फायदा घेऊन राजे शिवाजी कुतुबशाहीच्या मदतीने दक्षिण कर्नाटकात दाखल झाले होते. तेव्हाचा कर्नाटक म्हणजे कृष्णेचा दक्षिण तट ते आजच्या तमिळनाडूपर्यंतचा भूभाग होता. बातमी मिळताच दोन दिवसांनी दिनांक १५ मे १६७७ ला महाराज आत्मकूरच्या छावणीतून ससैन्य निघाले आणि दिनांक २० मे १६७७ रोजी जिंजीचा ताबा घेतला.

राजांच्या स्वराज्य स्वप्नपूर्तीचा तो अनमोल क्षण होता. राजांचे मन पिताश्री शहाजींच्या आठवणीने व्याकूळ झाले. याच जिंजीच्या वेढ्यात त्यांना दगाफटक्याने आदिलशाही सेनाप्रमुख नबाब मुस्तफाखानने बाजी घोरपड्याच्या मदतीने कैद केले आणि बेड्या घालून हत्तीवर मिरवत राजधानी विजापूरला पाठवून दिले होते. आज तोच जिंजी न लढता त्यांच्या ताब्यात होता. 'फक्त पक्षी आणि माकडेच राहू शकतात' अशी ख्याती असलेल्या किल्ल्याकडे महाराज नजर भरून बघत होते. खड्या, सरळसोट, उंच, विशालकाय शिळांच्या सोबतीने तटबंदी बांधून काढलेल्या या गिरीदुर्गाकडे खालून वर पाहता तटावर तट चढवल्याचा भास होत होता. किल्ल्याचा प्रथम तट तीन हात रुंदीचा होता. खंदक वीस हात रुंद व तेव्हढाच खोल होता. उंच डोंगरशिखरावर राजगिरी बालेकिल्ला दिसत होता. त्याच्या खाली पसरलेल्या डोंगरमाळांवर कृष्णगिरी, चंद्रायणदुर्ग हे नजरेस येत होते. पाण्याच्या दोन टाक्या, दोन निर्मळ पाण्याचे झरे, त्यातच किल्ल्यात दीड लाख कलम (जुने वजनमाप) धान्य साठवता येणारी पाच कोठारे आणि वर्षभर पुरेल इतके पिकवता येईल अशी मुबलक शेती परकोटाच्या आत दिसताच हा कोट परिपूर्ण असल्याचे जाणत्या राजांनी हेरले.



रंगनाथस्वामी मंदिर, जिंजी

गडावर विजयनगर साम्राज्याचे साक्ष देणारा भव्य कल्याण महाल, रंगनाथस्वामी मंदिर आणि इतर वास्तू बघून महाराज भारावले. भविष्याचा वेध घेत अडत्या काळात हाच दुर्ग कामात येईल, हे मनोमन हेरले. राजे आठ दिवस किल्ल्यात होते. या काळात त्यांनी सारा परिसर पिंजून काढत कच्चे दुवे शोधून काढले. त्यानुसार जरूर तिथे जुन्या तटबंध्या पाडून, त्या नव्याने युद्धसज्ज पद्धतीने त्वरित बांधून घेण्याचा आदेश इमारत अभियंता रुद्राजी साळवे यांना दिला. त्यामुळे नवीन बुरूज व

कोटाच्या मजबूत बांधणीस लगोलग सुरूवात झाली. मात्र, वेल्लोरला कुतुबशहाचा सेनाप्रमुख मिर्झा महंमद त्याच्या तोफखान्यासह गोवळकोंड्याकडे निघून जाण्याची बातमी येताच राजे वेल्लोरला निघून गेले. वेढ्याची विस्कळीत घडी नीट लावून ते परत जिंजीस आले. राजांनी जिंजीच्या आश्रयाने मुक्काम ठोकला. यावेळी त्यांची राहणी अत्यंत साधी होती. दोन जाडेभरडे तंबू, एक राजांसाठी आणि दुसरा सरदारांसाठी, बाकी छावणी उघड्यावर. इथूनच राजे एकेक मुलूख जिंकत, कब्जा करत, अधिकारी नेमत पुढे जात होते.

लवकर जिंजीचा कायापालट पूर्णत्वास गेला. राजांनी जिंजीची फक्त पुनर्बांधणीच केली नाही; तर येथील किल्ल्यांना त्यांची नवी ओळख करून देण्यासाठी त्यांची नांवेही बदलली. १. आनंदगिरी–राजगड २. कृष्णगिरी – कृष्णागिरी ३. भुईकोट – कोट त्रिचंडी ४. कुत्थअरसीदुर्ग – चेलगड ५. चंद्रायाणदुर्ग – सारंगगड ६. चक्कीलादुर्ग – लालगड ७. मुत्तुयालूनायकदुर्ग – गर्वगड ८. कुसमलाई–मदोन्मत्तगड. अशाप्रकारे गडाचे नवीनीकरण आटोपताच जिंजीचा गड दक्षिण भारताचे जुने जाणकार रघुनाथपंत हनमंते यांच्यावर किल्ल्याचा भार सोपवून राजे पुढील स्वारीसाठी रवाना झाले.

जिंजी मराठ्यांनी जिंकताच पोर्तुगीज, डच, इंग्रज आदी व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले. त्यांनी सामोपचाराची बोलणी सुरू केली. या आधी राजांनी इंग्रजांकडे पुष्टीकारक रत्ने आणि विषावरचे उतारे मागितले होते. त्याची किंमत द्यायची तयारी दर्शवली होती. पण, इंग्रजांनी कोणताच परतावा न घेता राजांना हव्या असलेल्या वस्तू पाठवून दिल्या.

सध्या, जिंजीकोट हा राजगिरी, कृष्णगिरी, चंद्रायणदुर्ग या तीन डोंगरी किल्ल्यांना जोडणारा स्थलदुर्ग आहे. राजगिरी किल्ल्याच्या सदरेवर जाण्यासाठी ८० फूट रुंद, १५ फूट खोल खंदक, ६० फूट रुंद तटबंदी व त्यानंतर पाच तटबंद्या, आणखी एक खंदक खेचून वेगळा करता येणारा पूल आणि १५ दरवाजे पार करावे लागतात. या किल्ल्याचा परीघ तीन मैल असून येथील, प्रत्येक किल्ल्याभोवती सर्व बाजूंनी दगडी तटबंद्या असून, त्यांना ठिकठिकाणी बुरूज आहेत. तोफांचा मारा करण्यासाठी या बुरुजांवर खिडक्या ठेवण्यात आल्या असून, बंदुकांच्या फैरी झाडण्यासाठी अनेक छिद्रे आहेत. किल्ल्यास उत्तरेचा वेल्लोर वा अर्काट दरवाजा, पूर्वेला पांडेचरी दरवाजा, पश्चिमेस लहानसा सैतानीदरी दरवाजा, तर दक्षिणेला खुरट्या आणि काट्याकुट्यांच्या झाडीवेलींनी व्यापलेले मुत्तुकाड जंगल आहे.

जिंजी किल्ल्यास इ.स २०० पासूनचा इतिहास आहे. जैन वस्त्या, पल्लव, चौल, पांडियन यांच्या पाठोपाठ या भागात कोण राजे होऊन गेले? इ.स.१२०० च्या दरम्यान आनंद कोण या मेंढपाळाला राजगिरी किल्ल्याच्या एका गुहेत अमाप धन सापडले आणि जिंजीच्या निर्मिती व भरभराटीचा एक नवा अध्याय सुरू झाला. कोणाच्या नंतर होयसाळ कुटुंब विजयनगरचे नायक यांनी हा देश शेती, उद्योग वाढवून संपन्न केला? नवनवीन राजे आणि नवीन सत्तांबरोबर जिंजीच्या किल्ल्याचा विस्तार देखील होत गेला. राक्षसतागडीच्या लढतीनंतर विजयनगर राज्याचे पतन झाले आणि दक्षिणेतील राजे स्वतंत्र झाले. या स्वातंत्र्याबरोबर आपापसातील हेवेदावे व अंतर्गत कलह निर्माण झाले. दरम्यान जिंजीच्या नायकांना शैव आणि वैष्णव या वादात पडण्याची दुर्बुद्धी सुचली आणि जिंजीच्या समृद्धीला उतरती कळा लागली.

शिवाजी महाराजानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात जिंजीचा किल्ला हरजीराजे महाडिक यांच्या ताब्यात होता. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राणी येसूबाईच्या आज्ञेवरून राजाराम महाराजांनी

राजधानी रायगडावरून पलायन केले व पन्हाळ्यास पोहोचले. तिथून तीनशे घोडेस्वारांच्या पथकासह ते जिंजीकडे मार्गस्थ झाले. १६८९ च्या अखेरीला त्यातले फक्त पाचजण कसेबसे ब्राह्मणांच्या वेषात जिंजीच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी येऊन उभे राहिले. तो क्षण जिंजीच्या किल्लेदाराच्या स्वामिनिष्ठेची कठोर परीक्षा घेणारा असला पाहिजे. यापूर्वी कधीही न पाहिलेल्या त्या परांगदा राजाला आश्रय देणं म्हणजे सर्वनाशाला आमंत्रण देण्यासारखं होतं. पण, कसं कोण जाणे, इमानदारीच्या गाठी अधिक पक्क्या ठरल्या. शिवबाराजांचा प्रताप आणि पुण्याई यांची जादू अजून टिकून होती. जिंजीनं राजारामांचं खुल्या दिलानं स्वागत केलं आणि स्वतःपाशी जे कांही होतं ते त्याच्या पायी वाहिले. राजारामाच्या पाठोपाठ औरंगजेबाचा सेनापती झुल्फीकारखानाने किल्ल्याच्या पायथ्याशी येऊन तळ ठोकला. हा वेढा सतत नऊ वर्षे सुरू होता! पण, त्याने या काळात एकदाही जिंजीस धडक देण्याचा प्रयत्न केला नाही.

सतत नऊ वर्षे बावीस सुभ्यांचा अधिपती असलेल्या औरंगजेबाच्या सेनेला मराठ्यांनी जिंजीच्या मदतीने रोखून धरले. मराठा सेनापती धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्या देदीप्यमान पराक्रमाने जिंजीचा आसमंत दुमदुमून टाकला. राजाराम महाराज आणि राणी ताराबाईने मुत्सद्दीपणा व पराक्रमाच्या जोरावर शक्तिशाली मोगलांना केवळ गुडघ्यावरच आणले नाही, तर त्यांच्यात दुफळी तयार करून मोघलांचा सेनाप्रमुख झुल्फिकारखान, वजीर असदखान आणि राजपुत्र कामबक्ष इतके निष्क्रिय करून टाकले की, लाखोंची फौज, बलाढ्य तोफखाना आणि प्रचंड खजिना असूनही मोगलांच्या हाती काहीच पडले नाही. नऊ वर्षे स्वराज्याला उसंत मिळवून देण्यात जिंजीच्या किल्ल्याचा मोठा वाटा आहे. शिवाजी महाराजांपासून राजाराम महाराजांपर्यंत स्वराज्याने एकूण वीस वर्षे जिंजीवर राज्य केले.

सन १९१३ मध्ये आलेल्या चक्रीवादळात कृष्णगिरी किल्ल्याच्या पायऱ्या उद्ध्वस्त झाल्या होत्या. परंतु जिंजीच्या व्यवस्थापनाने त्या मूळच्याच वाटाव्या इतक्या सुंदररीतीने त्या परत बसवल्या. आजही या किल्ल्यावर डागडुजी कामे सातत्याने होताना दिसतात. त्रिचंडी कोटाच्या तटबंदीची डागडुजी नुकतीच करण्यात आलेली आहे.

आता आपण त्या काळातील जुन्या जाणकारांची या किल्ल्याविषयाची मते जाणून घेऊ. इ.स. १५९९ साली जिंजीला भेट देणारा पिमेंटा जिंजीचा उल्लेख 'ट्रॉय ऑफ इस्ट' असा करतो. इतिहासकार आर्म म्हणतो की, 'उंच आणि अवघड पर्वतावर राहणाऱ्या भारतीयांना किल्ले अवघड वाटत नाहीत. परंतु ते भारतीय लोक नेहमीच जिंजीला कर्नाटकातील सर्वांत मजबूत किल्ला मानतात. कृष्णाजी सभासद म्हणतो, 'चंदी म्हणजे जैसे विजापूर, भागानगर तैसाच तक्काचा जागा येथे राजियांनी राहावे.'

हा किल्ला आजही अतिशय सुंदररीत्या जतन करण्यात येत आहे. दररोजची स्वच्छता आणि नियम पाळले जातात. जिंजीच्या किल्ल्याच्या व्यवस्थापनाकडून महाराष्ट्रातील व्यवस्थापनाने शिकणे गरजेचे आहे. कारण या बारा दुर्गांना यूनेस्कोने वैश्विक मूल्य मानले आहे. यावरून या दुर्गांचे आणि त्यांच्या इतिहासाचे महत्त्व अधोरेखित होते. तेंव्हा या किल्ल्यांची योग्य निगा हाच आजच्या काळातील शिवरायांना मानाचा मुजरा ठरेल!

– श्री. दिलीप नारायण वंडलकर
४, नरकेसरी सोसायटी,उज्ज्वलनगर,
वर्धा रोड, नागपूर– ४४००२५
मो.क्र.९८३४६३६६५५
इ–मेल– wandalkardilipgmail.com

●●●

मागे वळून पाहताना
(भाग - १)

कालिंदी कोल्हटकर ह्या वि. प्र. मं.च्या ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या एक निस्पृह, तसेच तन-मनाने एकाग्र झालेल्या माजी मुख्याध्यापिका. शिक्षण क्षेत्रात प्रवेश केल्यापासूनच्या आठवणींचा त्यांनी घेतलेला आढावा - संपादक

मागे वळून पाहताना अनेक आठवणी मनात दाटून येतात..!! कितीतरी प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहतात!! हो खरंच!! शाळेबद्दल लिहायचं आहे!! आमची शाळा, आमच्या सगळ्यांची शाळा!! सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा!! सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूल!! हो आमची शाळा, ए. के. जोशी स्कूल!!

शाळा सुरू झाली १९७६!! आमच्या मुख्याध्यापिका पटेल मॅडम, रोशन पटेल!! १९७६ ला लहान शिशू वर्ग व मोठा शिशू वर्ग चे वर्ग सुरू झाले; १९७७ ला दुसरी इयत्ता सुरू झाली. १९७८ ला तिसरी व चौथी इयत्ता सुरू झाली व १९७९ ला पाचवी, सहावी व सातवी इयत्ता सुरू झाल्या. सर्व विद्यार्थी इतर शाळांतून आले होते. ८ वी ची परवानगी १९८० साली मिळाली!!

शाळा १९७६ साली सुरू झाली, ऑगस्ट १९७९ मी रुजू झाले!! खरं म्हणजे मी इथे प्रवेश केला तो माझ्या मोठ्या मुलीच्या लहान शिशु वर्गाच्या प्रवेशासाठी! फॉर्म घ्यायला मी शाळेत प्रवेश केला! तळमजल्यातील मोकळा परिसर मला खूप आवडला, मनात विचार आला किती छान व स्वच्छ आहे हा परिसर!!

ऑफिसमध्ये गेले व पटेल मॅडमची ओळख झाली. खूप घाबरले! त्यांनी विचारले 'काय करतेस?', सांगितले, 'आत्ताच बी. एड. चा निकाल लागला. ६८% मिळाले.' मॅडम खूप खुश झाल्या. मला शिक्षिकेच्या पदासाठी अर्ज करण्यास सांगितले आणि मी ए. के. जोशी शाळेत गणिताची शिक्षिका म्हणून रुजू झाले. ५ ऑगस्ट १९७९. आणि इथेच खूप रमले!! अर्थातच मला ५वी आणि ६वी चे वर्ग मिळाले. हळूहळू शिक्षकांची संख्या वाढू लागली व आमची १०वी ची पहिली बॅच सुरू झाली १९८१-८२. सर्व इयत्तांच्या एक-एकच तुकड्या होत्या.

शाळेला विज्ञान विषयाची प्रयोगशाळा नव्हती. आमचे विद्यार्थी 'बेडेकर माध्यमिक विभाग' येथे जाऊन प्रयोग करायचे. 'चित्रकला' या विषयासाठीही वेगळी अशी वर्गखोली नव्हती. आमच्या मुख्याध्यापिकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शिक्षिका तयार होत होतो. पालकांची वर्षाच्या सुरुवातीला होणारी सभा 'विद्यार्थी अलंकार सभागृहात' आयोजित केली जात असे.

थोड्या काळाने पहिल्या मजल्यावर मुख्याध्यापिकांच्या कार्यालयाच्या शेजारी ग्रंथालय सुरू झाले व त्याच्या शेजारी आमचा शिक्षक कक्ष तयार झाला. तोपर्यंत आम्ही वर्गखोल्यांच्या येण्या-जाण्याच्या प्रवेशमार्गातील जागेत बसत होतो. एक-एक वर्ग वाढत होते, नवीन शिक्षिका रुजू होत होत्या व आम्ही काहीजणी ज्येष्ठ शिक्षिका झालो. अभ्यासाव्यतिरिक्त इतर स्पर्धांमध्ये आम्ही मुलांना तयार करू लागलो. 'झाली काय गंमत' हे आमचे पहिले नाटक! रोटरी क्लबच्या आंतरशालेय स्पर्धेसाठी ते बसवले. तेव्हा पोशाख भाड्याने मिळतात हे माहितीच नव्हते; पण नाटकाला जिल्हास्तरीय पहिले बक्षीस मिळाले. त्यानंतर मागे वळून पाहिलेच नाही. विविध स्पर्धांसाठी विद्यार्थी बाहेर जाऊ लागले व शाळेचे नाव सर्वांच्या परिचयाचे होऊ लागले. वेगवेगळ्या संस्थांचे आयोजक शाळेची प्रशंसा करू लागले.

'ए. के. जोशी शाळेच्या कार्यक्रमांना एक चांगला दर्जा असतो', असे म्हणू लागले.

तिसऱ्या मजल्यावर चित्रकलेसाठी वर्गखोलीची सोय झाली व विज्ञान विषयाची प्रयोगशाळा देखील सुरू झाली. मॅडम व आम्हा शिक्षिकांना खूप आनंद झाला. नंतर चौथ्या मजल्याचे बांधकाम झाले व तिथे मोठी सुसज्ज प्रयोगशाळा तयार झाली. विज्ञानाच्या प्रयोगशाळेसाठी चार वर्ग व एक सभागृह बांधून झाले. सभागृहाचा उपयोग अनेक कार्यक्रमांसाठी होऊ लागला. तिथे पुढे 'गार्गी सभागृह' उभारण्यात आले. अनेक विविध प्रकारचे कार्यक्रम तिथे होऊ लागले.

पहिल्या मजल्यावर चार बालवर्गांचे वर्ग, बालविभाग प्रमुखांचे कार्यालय, संगणक कक्ष, गणित प्रयोगशाळा आणि भूगोलाची प्रयोगशाळा तयार करण्यात आल्या.

गणित प्रयोगशाळेसाठी होमी भाभा विज्ञान केंद्राची खूप मदत झाली. प्रा. सुधाकर आगरकर सर व श्री. अरुण मालवणकर यांची मोलाची मदत व मोलाचे मार्गदर्शन मिळाले. शाळा त्यांची खूप आभारी आहे. विद्यार्थ्यांना गणित व भूगोलासाठी मोलाचे मार्गदर्शन मिळू लागले.

१९७६ ते १९८३ पर्यंत आमच्या मॅडम रोशन पटेल या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत होती. मॅडम या 'संस्थापक सदस्य' होत्या. त्यांच्या मनात एकच निर्धार होता की, त्यांची शाळा शैक्षणिक व इतर सर्व क्षेत्रांत चमकली पाहिजे! मॅडमबद्दल लिहिताना ती सर्व मागील वर्षे आठवली. मॅडम खूप कडक होत्या, पण त्यामुळे आम्ही शिक्षक म्हणून 'घडलो'. त्या १९८३ मध्ये अधीक्षिका झाल्या. आमच्या ज्येष्ठ शिक्षिका विद्या रेगे मुख्याध्यापिका झाल्या व मी पर्यवेक्षक झाले. ते वर्ष होते १९८४.

शाळा सोडताना मॅडमनी मला सांगितलेले अजूनही आठवते-''कालिंदी, माझ्या पश्चातही माझे अस्तित्व या शाळेच्या प्रत्येक कणात जिवंत राहील. माझी छाया सदैव तुझ्या पाठीशी उभी असेल. तुझ्या कार्याला कुणाच्याही वाईट नजरेचा किंवा अडथळ्याचा स्पर्श होऊ देणार नाही.'' केवढा विश्वास! केवढे प्रेम! त्यांना २२ मे १९९६ साली देवाज्ञा झाली. 'त्यांची कालिंदी' त्या दिवशी पोरकी झाली. त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरून मी चालण्याचा प्रयत्न करत राहिले. खरोखरच त्या सर्व कार्यांत पारंगत होत्या. त्यांनी आयुष्यभर शिक्षणाची सेवा केली.

सौ. विद्या रेगेने तिच्या पदाचा राजीनामा दिला १९८६. मी मुख्याध्यापिका म्हणून १ ऑगस्ट १९८६ला चार्ज घेतला. खरं म्हणजे मला मुख्याध्यापिकेचे पद नकोच होते. डॉक्टर साहेबांना मी तसं सांगितलं होते. तरी डॉक्टरसाहेब त्यांच्या निर्णयावर ठाम होते. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय मराठे सर म्हणाले, ''कोल्हटकर, घेऊन तर बघा; नाहीतर एक महिन्याने तुम्हाला पुन्हा शिक्षिकेच्या पदावर नियुक्त करू.'' सगळ्यांची विनंती, डॉक्टर साहेबांचा शब्द मोडणे महा-कठीण होते म्हणून मी एक महिन्यासाठी तयार झाले. १ ऑगस्ट १९८६ ला मुख्याध्यापिका म्हणून चार्ज घेतला. पण दहा-बारा दिवसांनी मनाशी ठरविले हे नकोच! १४ ऑगस्टला कार्याध्यक्ष श्री. मराठे सर सांगून गेले की, 'मी राजापूरला जाऊन येतो.' तिथे त्यांची शाळा होती. '१५ ऑगस्टला संध्याकाळी परत येतो.' तेव्हा नक्की ठरवले की, १६ ऑगस्टला त्यांना सांगायचे की, 'मला ही पोस्ट नको.' परंतु माननीय मराठे साहेब परत आलेच नाही. तिथेच त्यांचे निधन झाले! मग नंतर होणाऱ्या शाळा समितीच्या सभेमध्ये मी डॉक्टर साहेबांना सर्व सांगितले. ते म्हणाले, 'पण कोल्हटकर, मराठे आम्हाला काही म्हणाले नाहीत तरी मी विचार करतो.' नंतर येणाऱ्या प्रत्येक शाळा समितीच्या सभेमध्ये मी

डॉ. साहेबांना विनंती करायची व ते म्हणायचे, 'मी विचार करतो!' मग मात्र ठरवलं, यातून आपली सुटका नाही, आता आपल्याला कामाला सुरुवात करायला हवी!

माननीय रोशन पटेल मॅडम यांना आनंद झाला व 'त्यांची कालिंदी' त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करू लागली! तेव्हा बाल विभाग, प्राथमिक आणि माध्यमिक, असे तीनही विभाग मी सांभाळत होते. सर्व ज्येष्ठ शिक्षिकांची मदत, मॅडमचे मार्गदर्शन, विद्या प्रसारक मंडळातील माननीय मा. ना. पाटील सर, देव सर, करंदीकर सर, टिल्लू सर, खरडे सर या सर्व सभासदांचे मार्गदर्शन अशी सुरुवात झाली. मी खूप भाग्यवान. मला मार्गदर्शन मॅडमकडून मिळत होते. माझ्या सर्व ज्येष्ठ शिक्षिका सुमेधा कुलकर्णी, पर्यवेक्षक तेलंग, भोळे यांची साथ मिळाली. मला माझ्या इतर शिक्षिकांचे पण खूप सहकार्य मिळाले! माझा शिक्षक व कर्मचारीवर्ग काम करायला नेहमी तयार असायचा! शिक्षक सभा सुरू झाल्या. ज्येष्ठ शिक्षकांचे शैक्षणिक सल्लागार मंडळ उदयास आली व शाळेच्या बऱ्याच बाबींची चर्चा करून शाळेचे बरेचसे निर्णय या सभेमध्ये घेतले जाऊ लागले!! तेलंग माझी पर्यवेक्षक व या सर्वजणी शैक्षणिक सल्लागार मंडळाच्या पदाधिकारी झाल्या, त्यांचे सहकार्य असावयाचे.

तसेच माझे व्यवस्थापन, सर्व पदाधिकारी, डॉक्टर साहेब यांची मी खूप ऋणी आहे. त्यांचे सहकार्य व मार्गदर्शनामुळे अतिशय साधी असलेली कालिंदी खूप मेहनत घेऊन मुख्याध्यापिका म्हणून काम करू लागली.

दहावीचा शंभर टक्के निकाल १९९३ पासून सुरू झाला. त्या आधी १९९० मध्ये बोर्डात स्वप्निल महाजन सहावा व मिलिंद नागनूर याने तेरावा क्रमांक मिळवला, तेव्हापासून १००% निकाल व बोर्डात क्रमांक असा निकाल लागू लागला! १००% निकालाच्या आधी विद्यार्थी क्रमांक मिळवू लागले तेव्हा डॉक्टर साहेब मला म्हणाले, 'बोर्डात क्रमांक हे ठीक आहे पण १००% निकाल लागला पाहिजे!' त्याप्रमाणे आम्ही शिक्षिका अभ्यासात कमी असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू लागलो. गणितचा माझा अभ्यासक्रम पूर्ण झाला की अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना एक तास शिकवू लागले! नंतर गुणवत्ता यादीसाठी विद्यार्थ्यांची निवड होऊ लागली. त्यांच्यासाठी शिक्षिका 'विशेष मार्गदर्शन वर्ग' घेऊ लागल्या आणि त्यांना विशेष प्रशिक्षण देऊ लागल्या.

१९९६ मध्ये सुरू झालेला १००% निकाल २०२५ पर्यंत कायम आहे. फक्त मध्ये चार वर्ष ९८%, ९९% असा होता!! शिक्षिकांची प्रचंड मेहनत!! ८ मे २०२५ माझा शेवटचा दिवस होता. मी सुट्टीतील अध्यापनाची जबाबदारीही मनापासून पार पाडली. अध्यापन हाच माझ्या जीवनाचा श्वास आहे. शिक्षकाची भूमिका निभावताना मला नेहमीच अपार आनंद, समाधान आणि कर्तव्यपूर्तीची अनुभूती मिळाली.

१९८९ मध्ये तीनही विभाग वेगळे झाले. तो माझा निर्णय होता. बालवर्गाचे प्रमुख विशाखा देशपांडे, प्राथमिक प्रमुख चित्रा शुक्ला, माध्यमिक प्रमुख कालिंदी कोल्हटकर अशा तीन मुख्याध्यापिका, तीन विभागाच्या झाल्या व १९८९ मध्ये सौ. तेलंग पर्यवेक्षक म्हणून माध्यमिकला रुजू झाल्या. अत्यंत मेहनती, प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अशा तेलंग शिक्षिकेने मला शेवटपर्यंत साथ दिली.

शाळेच्या शैक्षणिक आणि इतर सर्व क्षेत्रांत आम्ही सर्वजण खूप मेहनत घेऊ लागलो. सुमेधा कुलकर्णी ज्येष्ठ शिक्षिका बालवर्गाच्या प्रमुख झाल्या.

बालवर्गाच्या प्रमुख सौ. विशाखा देशपांडे

१९९६ – १९९८, सौ. कविता जाधव

२००१ ते २००४, सौ. मेघना मुलगुंद

१९९८ – २००१ व २००४ – २०१९, मेघनाचे बालविभागसाठी अनेक वर्षांचे योगदान आहे.

बालविभागासाठी हसत खेळत शिकवण्याची पद्धत सुरू केली गेली (२००१-२००२). पूर्णपणे जुनी पद्धत बदलून ही नवीन अध्यापन पद्धती सुरू करण्यात आली. वर्गातील बाके काढून घेण्यात आली. मुक्त वातावरणातील अध्यापन सुरू झाले आमच्या छोट्या मुलांसाठी! शिकवण्याच्या पद्धती बदलल्या. घोकंपट्टीची पद्धत बंद झाली. अतिशय मोकळ्या वातावरणात अध्यापन सुरू होऊन छोटी मुले कंपनीत सहभागी होऊन आनंदाने शिकू लागली. अध्यापन पद्धतीवर विशेष भर दिला गेला. या अध्यापन पद्धतीचे जनक नितेश निमकर यांच्या 'आयना' येथील शाळेत येऊन सर्व शिक्षकांना त्याचे प्रशिक्षण देण्यात आले. आमच्याबरोबर मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. करंदीकर सरही प्रशिक्षणात सहभागी झाले. ठाण्यात आपली पहिली शाळा हसत खेळत शिकण्याची पद्धत सुरू करणारी!!

विद्यार्थी पुढील वर्गात गेल्यानंतर या पद्धतीचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले. लहान मुलांसाठी विविध प्रकारची शैक्षणिक साधने आणली गेली. तसेच छोटी पुस्तके, गोष्टींची पुस्तके त्यांच्या हातात देण्यात येऊ लागली. आता लहान मुलेही ग्रंथालयात जाऊ लागली. त्यांचा पहिला थांबा माझे कार्यालय असे. कार्यालयात येऊन ते भरपूर गप्पा मारत बसत.

एकदा मी सहज म्हणाले, ''चला, पळा आता ग्रंथालयात.''

त्यावर एक छोटीशी मुलगी पटकन म्हणाली, ''अग, पळायला कशाला सांगते? जागा तरी आहे का?'' तिच्या या निरागस उत्तरावरून कार्यालय किती छोटे होते, याची जाणीव झाली.

या मुलांनी मला खूप आनंद दिला. छोट्या मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करून बक्षिसे देण्यास सुरुवात झाली. सर्व सण उत्साहाने साजरे होऊ लागले. रस्त्यात भेटली तरी ही मुले मला 'डीन मॅडम' म्हणून हाक मारत आणि मीदेखील त्यांची डीन मॅडम झाले.

पुढे लहान शिशुवर्ग, मोठा शिशुवर्ग बरोबरच नर्सरी वर्गही सुरू झाला. खालच्या शिशुवर्गासाठी स्वतंत्र इमारतीची व्यवस्था करण्यात आली. या छोट्या मुलांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आपल्या शाळेच्या रंगमंचावर होत असे, तर क्रीडा स्पर्धा ठाणे कॉलेजच्या मैदानावर आयोजित केल्या जात. या लहान मुलांना प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे काम सौ. अपर्णा वरुडकर व इतर शिक्षिका करत असत. भारत स्काऊट्स आणि गाईड्स अंतर्गत बनीटम टोला सुरू झाला. श्री. मंदार मेहेंदळे हे मुलांना नृत्य शिकवण्यासाठी येऊ लागले.

प्राथमिक विभाग पहिली ते चौथीचे वर्ग सुरू झाल्यानंतर १९८९ साली सौ. चित्रा शुक्ला या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका झाल्या. इयत्ता पहिली ते चौथीतील सर्व शिक्षकांनी अथक परिश्रम घेऊन प्राथमिक विभागाला उत्कृष्ट शैक्षणिक यश मिळवून दिले.

सर्व स्पर्धांमध्ये ही छोटी कंपनी भाग घेऊ लागली व अनेक बक्षीस मुलांना मिळू लागली. सर्व उपक्रम, कार्यक्रम, वार्षिक स्नेहसंमेलन खूप दणक्यात होऊ लागले!! हिंदी, गणित, इंग्लिशसाठी बाहेरच्या परीक्षांना मुले बसू लागली व उत्तम यश मिळवू लागली! गेली अनेक वर्षे मुख्याध्यापिका अंजना कपूर खूप मेहनत घेऊन प्राथमिक विभाग चांगल्या पद्धतीने सांभाळत आहेत.

दोन वर्षांपूर्वी डॉ. महेश बेडेकर यांनी विविध क्रीडा उपक्रम सुरू केले. आजही हे विविध क्रीडा उपक्रम आणि क्रीडा स्पर्धा नियमितपणे आयोजित केल्या जातात. विद्यार्थी या क्रीडा उपक्रमांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी होतात व मनापासून आनंद घेतात. गणित विषयातील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन गणित अबॅकसचे वर्ग सुरू करण्यात

आले आहेत. संध्याकाळी पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी क्लासेस सुरू झाले आहेत. समुपदेशक सौ. सविता राव या तिन्ही विभागांसाठी रुजू झाल्या आहेत.

माध्यमिक विभाग: मुलांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यास या विभागाचा खूप मोठा वाटा आहे. व्यक्तिमत्त्व घडविण्यास या वयात मिळणारे संस्कार खूप महत्त्वाचे आहेत! या काळात मिळणारे संस्कार कायम स्वरूपात राहतात. अर्थातच शिक्षकांची जबाबदारी खूप मोठी! अभ्यास वाढतो, शिक्षिकाला खूप महत्त्वाची भूमिका पार पाडायची असते! या विभागाला भरपूर निकाल असतात त्यामुळे खूप मनापासून या विभागावर फोकस केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले, इतर अनेक परीक्षांसाठी मुलांना तयार केले व हळूहळू निकाल मिळत गेले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले. विविध स्पर्धा व परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची विशेष तयारी करून घेतली जाऊ लागली. त्याचे फळ म्हणून शाळेच्या निकालात सातत्याने प्रगती होत गेली. १९९३ ते २०२५ या सलग २६ वर्षांच्या कालावधीत दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. सन २००० साली नचिकेत थोरात याने दहावीच्या मुंबई विभागीय मंडळाच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असे यश संपादन केले. तो क्षण आम्हा सर्वांसाठी खऱ्याअर्थाने सुवर्णक्षण ठरला. १९८२ ते २००१ या कालावधीत अनेक विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले व गुणवत्तायादीत मानाचे क्रमांक पटकावले. त्यानंतर मंडळाच्या पद्धतीत बदल करण्यात आला. माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी व सातवीसाठी सुरू करण्यात आली. १९८७ नंतर ही परीक्षा इयत्ता पाचवी व आठवीसाठी घेण्यात येऊ लागली. गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली. १९८७ पासून या परीक्षेचाही निकाल शंभर टक्के लागला. अनेक विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन करून गुणवत्तायादीत मानाचे क्रमांक पटकावले आणि शाळेची गौरवशाली परंपरा अधिक समृद्ध केली. (क्रमश:)

– सौ. कालिंदी कोल्हटकर
ब्लॉक नं. १४, २रा मजला, गिरिराज सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या जवळ,
नौपाडा, ठाणे – ४००६०२
भ्रमणध्वनी : ९८२०३५४१८०

●●●

(मुखपृष्ठ क्र.२ वरून – **संपादकीय**)

वरच्या मजल्याला एक गच्ची दिली आहे. गच्चीत जाऊन आपण मोकळ्या हवेचा आनंद घेऊ शकतो किंवा आजूबाजूच्या परिसरावर नजर टाकू शकतो. पुढे पाहिले की, जवळच एक थ्रीडी फिल्म थिएटर दिसते. जरा पुढे नजर टाकली तर आपल्याला फिनिश पार्लमेंटची सुबक इमारत दिसते. त्याचबरोबर सुंदर सुंदर बागा आपल्या नजरेस पडतात. ही सगळी दृश्ये नजरेत साठवून आपण या वाचनालयाचा वेगळेपणाचा विचार करू लागलो. इथे कुणीही येऊ शकतो, प्रवेश विनामूल्य आहे, कितीही वेळ खर्च करू शकतो आणि तिथे असलेल्या सुविधांचा उपयोग करू शकतो. पुस्तकी ज्ञानाबरोबरच नवनिर्मितीचा आनंद आपण येथे घेऊ शकतो. सध्या वाचन संस्कृती लयाला चालली अशी ओरड केली जाते. ग्रंथालयात येणाऱ्या लोकांची संख्या कमी होत आहे असे वारंवार सांगितले जाते. परंतु ग्रंथालयाला तंत्रज्ञानाची आणि नवनिर्मितीची जोड दिली तर लोक त्याकडे आकर्षिले जातील असे 'ऊडी' ला भेट दिल्यानंतर मला वाटायला लागले आहे. अशा प्रकारची वाचनालये आपल्या देशात उभारली तर किती चांगले होईल!

– डॉ. सुधाकर आगरकर

●●●

भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या

'भारतरत्न' डॉ. विश्वेश्वरैय्या हे एक दुर्मीळ असे, 'न भूतो, न भविष्यती' असे आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारतीय असणारे व्यक्तिमत्त्व. त्यांची ओळख, त्यांचे परिश्रम, त्यांचे कर्तृत्व या लेखात विशद केले आहे ! – संपादक



आंतरराष्ट्रीय कीर्तीचे स्थापत्य अभियंता, वास्तुशास्त्र विशारद, कुशल अर्थतज्ज्ञ व आर्थिक सल्लागार, द्रष्टा व यशस्वी अभियंता, कर्तव्यदक्ष प्रशासक, म्हैसूर संस्थानचे शिल्पकार व दिवाण, उद्योगपती, योजनाधिपती, तांत्रिक सल्लागार, कुशल शिक्षणतज्ज्ञ, क्रीडाप्रेमी, दूरदर्शी समाजसेवक, समाजसुधारक, साहित्यिक, भाषाप्रेमी व देशप्रेमी अशा निव्वळ अष्टपैलूच नव्हे, तर बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा धनी म्हणजे सर, भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या!

तांत्रिक क्षेत्रातील कुशाग्रबुद्धिमत्तेचा जादूगार, असामान्य कल्पनाशक्तीचा महामेरू, विद्वानांतील शिरोमणी, गाढ व्यासंगी, अभ्यासू व चिकित्सक, संशोधक, नीतीमत्तेचा पुजारी व चारित्र्याचा मूर्तिमंत रत्नाकर अशा विविधपैलूंनी व गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व नटलेलं होतं. त्यांच्या बुद्धिमत्तेचे तेज इतके प्रभावी होते की, त्यांनी केवळ अभियांत्रिकीच्या क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक व साहित्यिक क्षेत्रातही त्यांचे असामान्य योगदान आहे. तसेच त्यांनी संपूर्ण देशाच्या प्रगतीच्या वाटेवरही ठोस पायाभरणी केलेली आहे. देशाच्या आधुनिकतेच्या प्रवासात त्यांनी घडवलेल्या वाटा म्हणजे एक प्रेरणादायी अध्यायच आहे. त्यांचा जीवनप्रवास म्हणजे कल्पकतेचा, सेवाभावांचा व अथक परिश्रमांचा त्रिवेणी संगम आहे, जो आजही प्रत्येक भारतीय अभियंत्याच्या मनात आदराचे स्थान मिळवतोय!

विज्ञान युगातील चमत्कार म्हणून डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचे नाव स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात जगात सुप्रसिद्ध आहे. निरपेक्ष व नियमित काम, वेळेवर भोजन व निद्रा, नियमित व्यायाम, व्याधीमुक्त व क्रोधमुक्त जीवन ही त्यांची जीवनमूल्ये होती. कर्म हीच पूजा आणि जनसेवा व देशसेवा हीच ईशसेवा हे त्यांच्या जीवनाचे मूलमंत्र-ब्रीदवाक्य होते.

डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या हे त्यांच्या काळाच्या खूप पुढचा विचार करणारे द्रष्टा-दूरदर्शी अभियंता होते. मर्यादित साधनसंपत्ती-सामग्री व मर्यादित तंत्रज्ञानाच्या बळावर त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेने; जे काही साध्य केले होते, ते पाहून अगदी ब्रिटिश अभियंत्यांनीही त्यांच्या प्रतिभेची पावती दिली होती. त्यांनी आपल्या हयातीत असे काही अनेक प्रकल्प तयार केले आणि त्यांचे वास्तवात रूपांतर केले, जे अनेकांना अशक्यप्राय वाटत होते.

डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचा जन्म म्हैसूर राज्यातील कोलार जिल्ह्याच्या चिक्कबळळापूर तालुक्यातील मुद्देनहळ्ळी या खेड्यात दि. १५ सप्टेंबर १८६१ रोजी श्रीनिवास शास्त्री व वेंकटलक्षम्मा या सुशील व धार्मिक ब्राह्मण दाम्पत्यांच्या पोटी झाला. ते

त्यांच्या माता-पित्यांचे द्वितीय अपत्य होते. त्यांच्या वडिलांचे जन्मगाव पूर्वी म्हैसूर राज्यात होते. त्यांचे वडील श्रीनिवास शास्त्री हे एक संस्कृत विद्वान, हिंदू ग्रंथांचे भाष्यकार व आयुर्वेदिक वैद्य होते. त्यांचे पूर्वज सध्याच्या आंध्र प्रदेशातील प्रकाशम जिल्ह्यांत असलेल्या गिद्दलपूर नजिकच्या मोक्षगुंडम या खेडेगावातील होते. या पूर्वजांनी सुमारे तीनशे वर्षांपूर्वी म्हैसूर राज्यात स्थलांतर केले होते. मोक्षगुंडम हे नाव त्यांची आंध्रप्रदेशशी असलेली संलग्नता दर्शविते.

डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांनी आपले प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिक्षण चिक्कबळळापूर येथे सन् १८७६मध्ये पूर्ण केले. त्यांच्या कुशाग्र व तल्लख बुद्धिमत्तेचे तेज पाहून त्यांचे सर्वत्र कौतुक होऊ लागले.ते १५ वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. पुढील शिक्षणासाठी ते बंगळुरूला आपले मामा रामय्या यांचेकडे राहायला आले. त्यांनी सन १८७६ मध्ये बंगळुरू येथील वेस्लीन मिशन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यांनी मॅट्रिकची परीक्षा सन् १८७८ मध्ये विज्ञान व गणित हे मुख्य विषय घेऊन, प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आणि ते म्हैसूर राज्यात सर्व विद्यार्थ्यांत गुणानुक्रमे सर्वप्रथम आले.

मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांनी 'शिका व शिकवा' या तंत्राचा अवलंब करून, बंगळुरू येथील सेंट्रल कॉलेजमध्ये सन १८७८ मध्ये पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेतला. सन १८८० मध्ये विज्ञान व गणित हे मुख्य विषय घेऊन, त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत बी.ए.ची पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन, अभियंता होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. परंतु त्यावेळी म्हैसूर राज्यात तांत्रिक, अभियांत्रिकी शिक्षणाची सोय नव्हती. त्यांची बिकट आर्थिक परिस्थिती व कुशाग्र बुद्धिमत्ता पाहून, सेंट्रल कॉलेजचे तत्कालीन ब्रिटिश प्राचार्य यांनी केलेल्या शिफारशीमुळे त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी ब्रिटिश सरकारने शिष्यवृत्ती प्रदान केली. त्यांच्या स्वप्नपूर्तीचा योग जुळून आला होता.

मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांनी सन् १८८०मध्ये पुणे (महाराष्ट्र) येथील सायन्स कॉलेज (सध्याचे स्वायत्त गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग) मध्ये तीन वर्षीय स्थापत्य अभियांत्रिकी या विद्या शाखेत प्रवेश घेतला. ब्रिटिश काळात ही संस्था बॉम्बे विद्यापीठाशी संलग्न होती. त्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन, चिकाटीने अभ्यास करून, हा तीन वर्षीय अभ्यासक्रम फक्त अडीच वर्षांतच पूर्ण केला. सन १८८३ मध्ये त्यांनी एल.सी.ई.व एफ.सी.ई.(बी. ई. समकक्ष) परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केल्या आणि ते बाँम्बे विद्यापीठात सर्व विद्यार्थ्यांत सर्वप्रथम आले.

मार्च १८८४ मध्ये बाँम्बे प्रांत सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागात त्यांची सहाय्यक अभियंता या पदांवर नियुक्ती करण्यात आली. ते नाशिक येथे नोकरीवर रूजू झाले. नाशिक जिल्ह्यातील दातारी गावाजवळील नाल्यावरील जलवाहिनी पांजरा नदीच्या पाण्यामुळे पावसाळ्यात वाहून जाण्याची समस्या नेहमी भेडसावत होती. या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी पावसाळ्यात ते कधी पोहून जात, तर कधी घोड्यावर बसून पाण्यातून जात असत. अशाप्रकारे अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जाऊन, त्यांनी जलवाहिनीच्या दुरुस्तीचे अवघड काम दिवस-रात्र एक करून, नियोजित वेळेत पूर्ण केले. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाची स्पर्धा-इतर परीक्षा विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण केली आणि उपअभियंता म्हणून त्यांची पदोन्नती करण्यात आली.

मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांची पुणे येथे नोव्हेंबर १८९५ मध्ये उपअभियंता या पदी बदली करण्यात

आली. येथे खडकवासला धरणाच्या पाण्याचा वापर करून, त्यांनी पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविला. तसेच त्यांनी येथील प्रमुख रस्त्यांचे व प्रसिद्ध इमारतींचे आराखडे तयार केले.

बॉम्बे प्रांतच्या सिंध भागात असलेल्या सक्कर शहराला सिंधू नदीचे गढूळ व अशुद्ध पाणीपुरवठा होत असे. या शहराला शुद्ध पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी बॉम्बे सरकारने सन १८९३ मध्ये मो. विश्वेश्वरैय्या यांचेवर सोपविली. त्यांनी अथक परिश्रम घेऊन सिंधू नदीचे पाणी शुद्ध करण्याची अल्प खर्चाची योजना राबवून, सक्कर शहराला जलवाहिनीद्वारे शुद्ध व स्वच्छ पाणीपुरवठा केला.

मो. विश्वेश्वरैय्या यांची बदली पाट-बंधारे विभागात करण्यात आली. सन १८९९ मध्ये अत्यल्प पावसामुळे दुष्काळ पडला होता. तेव्हा जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये एक चर्चासत्र आयोजित केले. त्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेऊन, बागायतदारांसाठी एक मौल्यवान व नावीन्यपूर्ण उपाययोजना सुचविली. याला त्यांनी 'ब्लॉक इरिगेशन सिस्टिम' असे नाव दिले. तसेच धरणातील पाण्याचा अपव्यय होऊ नये किंवा पावसाळ्यात पाणी वाहून जाऊ नये म्हणून त्यांनी पाण्याच्या नैसर्गिक दाबावर आधारित स्टेनलेस स्टीलचे न गंजणारे स्वयंचलित दरवाजे ही ब्लॉक सिस्टिमसाठी नवी संकल्पना मांडली. या स्वयंचलित दरवाजांना 'विश्वेश्वरैय्या गेट्स' म्हणून आजही ओळखले जाते.

देशातील एका गोदी बंदरामध्ये जहाज बांधणीचे वेळी विशिष्ट प्रकारचे वंगण उपलब्ध होऊ न शकल्यामुळे जहाजाचा उद्घाटन समारंभ पुढे ढकलावा लागणार होता. तेव्हा मो. विश्वेश्वरैय्यांनी वंगणाऐवजी कुजकी केळी वापरण्याचा पर्यायी उपाय सुचविला आणि ब्रिटिश सरकारचे लाखो रुपयांचे होणारे नुकसान टाळले. त्यांची 'जिल्हा कार्यकारी अभियंता' म्हणून बढती करण्यात आली.

मो. विश्वेश्वरैय्या सन १९०४ मध्ये पुणे येथील खडकवासला धरणाच्या दगडी भिंतीवर त्यांनी स्वयंचलित दरवाजे प्रथमच बसविले आणि पाण्याचा अपव्यय टाळला. त्यांच्या अंगी असलेली प्रज्ञा, कार्यकुशलता, कार्यक्षमता, कर्तव्यदक्षता, कल्पक बुद्धीमत्ता व सचोटी पाहून, त्यांना 'अधीक्षक अभियंता' म्हणून प्रथमच पदोन्नती देण्यात आली. एकाही भारतीय अभियंत्याला यापूर्वी या पदावर बढती देण्यात आलेली नव्हती. इजिप्तमधील एडन बंदरावर प्रवासी व यात्रेकरूंना पिण्यासाठी शुद्ध व गोड पाणी मिळणे फारच दुर्मीळ झाले होते. सन १९०६मध्ये त्यांनी समुद्राचे खारट पाणी शुद्ध करून, जलवाहिनीद्वारे एडन बंदर व एडन शहराला पाणीपुरवठा करण्याची योजना सुचविली. पुढे स्वयं-चलित दरवाजांचा उपयोग त्यांनी तिगटा धरण, ग्वाल्हेरचे टिक्का धरण, कृष्णार्जुन सागर धरण आदी धरणांवर करून, सिंचन क्षमता वाढविली आणि पूर नियंत्रणही केले.

सार्वजनिक बांधकाम विभागात मुख्य अभियंता हे पद ब्रिटिश अभियंत्यासाठीच राखीव होते. त्यामुळे त्यांना डावलून कनिष्ठ अधीक्षक अभियंत्याला मुख्य अभियंतापदी पदोन्नती देण्यात आल्यामुळे त्यांनी सन् १९०८ मध्ये आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि शासकीय नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती पत्करली.

सप्टेंबर १९०८ रोजी हैदराबाद शहरात पडलेल्या मुसळधार पावसामुळे लाखो रुपयांची वित्तहानी व प्राणहानी झाली होती. यावर कायमची उपाययोजना करण्यासाठी हैदराबाद संस्थानच्या निजाम सरकारने मो. विश्वेश्वरैय्यांना इटलीहून पाचारण केले. मुख्य अभियंत्याला मिळणारे वेतन घेण्याच्या अटीवर त्यांनी

एप्रिल १९०९ पासून हैदराबाद येथे आपल्या कामाचा श्रीगणेशा केला. सुमारे दोन कोटी रुपये खर्च करून, 'उस्मान सागर व हिमायत सागर' हे दोन मोठे जलाशय, एक सुंदर उद्यान व सिकंदराबाद या शहराची निर्मिती करून, एप्रिल १९१३ मध्ये त्यांनी काम पूर्ण केले. या उपाय योजनांमुळे हैदराबाद शहराचा कायापालट आणि पुरापासून कायमचे संरक्षण व आरोग्य संवर्धन झाले.

मो. विश्वेश्वरैय्या यांच्या ज्ञानाचा, कर्तृत्वाचा व अनुभवाचा लाभ घेण्यासाठी म्हैसूर संस्थानचे महाराज कृष्णराज वडियार (चतुर्थ) हे अग्रेसर होते. ज्या मातृभूमीत जन्म घेतला, त्या मातृभूमीची सेवा करण्याची सुवर्णसंधी त्यांनी आनंदाने स्वीकारली. त्यांनी दि. १५ नोव्हेंबर १९०९ रोजी 'म्हैसूर संस्थानचा मुख्य अभियंता' म्हणून ही नवी जबाबदारी आनंदाने स्वीकारली. ते देशातील पहिले भारतीय मुख्य अभियंता ठरले. त्यांनी सन् १९१२ पर्यंत मुख्य अभियंता म्हणून म्हैसूर संस्थानात कार्य केले.

म्हैसूर शहराजवळील कावेरी नदीवर एक धरण, एक जलविद्युत केंद्र व वृंदावन उद्यान निर्मितीची महत्त्वाकांक्षी योजना मो. विश्वेश्वरैय्यांनी सन १९१० मध्ये महाराजांना सादर केली. महाराजांनी या प्रस्तावाला मान्यता दिली आणि नोव्हेंबर १९११ पासून बांधकामास सुरुवात केली. सन १९१२ मध्ये त्यांची म्हैसूर संस्थानचे दिवाणपदी नियुक्ती करण्यात आली. तेव्हा या बांधकामास विशेष गती मिळाली. त्यांनी सन् १९१८ मध्ये आपल्या दिवाण पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर या कामाला विरोध झाल्याने गती थोडी मंदावली होती. परंतु नव्या दिवाणांनी व ब्रिटिश सरकारने ही योजना उचलून धरली. शेवटी सन् १९३१ मध्ये ही योजना पूर्ण करण्यात आली. या धरणाचे नामाभिधान 'कृष्णराजसागर (के.आर.एस) धरण' असे करण्यात आले.

विश्वेश्वरैय्या हे अतिशय कडक शिस्तीचे भोक्ते होते. ते आपले प्रत्येक काम स्वतः शिस्तबद्ध व योजनाबद्ध पद्धतीने करीत असत. लेखी परवानगीशिवाय कार्यालयीन वेळेत कोणालाही प्रत्यक्ष भेटीसाठी ते वेळ देत नसत आणि भेटतही नसत. एक मिनिट जरी उशीर झाला, तरी ते भेट नाकारत असत. ते चर्चेतील कोणतेच प्रकरण प्रलंबित ठेवत नसत. म्हैसूर संस्थांमध्ये अधिकारी नियुक्त करण्यासाठी त्यांनी म्हैसूर सिव्हिल सर्व्हिसेस या स्पर्धा परीक्षेची सुरुवात केली.

मो. विश्वेश्वरैय्यांनी आपल्या 'दिवाणपदा'च्या काळात हजारो नवीन शाळा उघडून, सुमारे ३ लाख ६६ हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. त्यांनी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. म्हैसूर संस्थानांत बंगळुरू व म्हैसूर येथे फक्त दोनच महाविद्यालये होती. येथे विद्यापीठ नसल्याने ती मद्रास विद्यापीठाला संलग्न होती. त्यांनी सन् १९१३ मध्ये बंगळुरू येथे कृषी महाविद्यालय सुरू केले आणि कालांतराने कृषी विज्ञान विद्यापीठ सुरू केले. सन १९१३ मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या सरकारमध्ये एक स्वतंत्र रेल्वे विभाग सुरू केला आणि सुमारे ५०० किमी लांबीचे लोहमार्ग प्रस्थापित केले. तसेच सन १९१३ मध्ये त्यांनी ग्राम पंचायतची गावोगावी स्थापना केली.

मो.विश्वेश्वरैय्यांनी बंगळुरू येथे मेकॅनिकल इंजिनीअरिंग स्कूल (सध्याचे विश्वेश्वरैय्या कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग) सुरू केले. त्यांनी बंगळुरू येथे कॉमर्स स्कूल सुरू केली. त्यांनी म्हैसूर येथे राजेंद्र टेक्निकल स्कूल व एस.जे. पॉलिटेक्नीक सुरू केले. तसेच प्रत्येक जिल्ह्यात त्यांनी एक औद्योगिक संस्था सुरू केली. म्हैसूर संस्थानचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांनी सन् १९१४ मध्ये म्हैसूर येथे एक आर्थिक परिषद आयोजित केली. मे १९१५ मध्ये त्यांनी कर्नाटक साहित्य परिषद ही संस्था स्थापन केली. त्यांनी जुलै १९१६

मध्ये स्वतंत्र म्हैसूर विद्यापीठाची स्थापना केली. खऱ्या अर्थाने ते शिक्षण महर्षी होते. मागासवर्गीयांचे मसीहा होते.

मो. विश्वेश्वरैय्यांनी म्हैसूर संस्थानांत औद्योगिक क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने सन १९१३ मध्ये म्हैसूर येथे म्हैसूर बँक स्थापन केली. उद्योजकांना सवलतीच्या दरात कर्ज मिळू लागल्याने औद्योगिक विकासाला चालना मिळाली. स्थानिक स्तरांवर न्यायनिवाड्यासाठी सन १९१३ मध्ये त्यांनी गावोगावी ग्रामीण न्यायालये सुरू केले. संस्थानच्या विकासासाठी सन १९१४ मध्ये त्यांनी महानगर विकास परिषद स्थापन केली. सन १९१४ मध्ये म्हैसूर आर्थिक परिषद स्थापन केली. त्यांनी मोठ्या प्रमाणात रेशीम व चंदन निर्मिती करण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहित केले आणि म्हैसूर येथे श्रीकृष्ण राजेंद्र कापड गिरणी सुरू करून, रेशीम कापडाचे उत्पादन सुरू केले. म्हैसूर येथे चंदन तेल कारखाना व साबण कारखाना सुरू केला. त्यांनी म्हैसूर येथे म्हैसूर पेपर मिल हा कारखाना सुरू केला. संस्थानातील कोलार व तुमकर जिल्ह्यात त्यांनी गूळ उत्पादन केंद्रे सुरू केली. त्यांनी कुटिरोद्योग व लघुउद्योगाला भरपूर प्रोत्साहन दिले.

म्हैसूर संस्थानांतील मोठ्या शहरात विश्वेश्वरैय्यांनी सर्व सुखसोयी व सुविधायुक्त हॉटेल्स प्रस्थापित केले. बंगळुरू येथे सेंच्युरी क्लब व लेडिज क्लबच्या स्थापने साठी त्यांनी पुढाकार घेतला. तसेच पुणे येथे डेक्कन क्लब स्थापने साठीही त्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी सन् १९२२ मध्ये म्हैसूर संस्थानांत भद्रावती येथे लोखंड व पोलाद कारखाना सुरू केला आणि त्याचे व्यवस्थापन स्वतः स्वीकारून, तो भरभराटीस आणला.

मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्यांनी दि.९ डिसेंबर १९१८ रोजी स्वेच्छेने दिवाणपदाचा राजीनामा दिला. त्यांनी इटली, स्वीडन, इंग्लंड, हॉलंड व अमेरिका या देशांतील मोठ्या कारखान्यांना प्रत्यक्ष भेटी देण्यासाठी दौरे केले. त्यांनी टाटा आयर्न अँड स्टील कंपनी (टिस्को) सुरू करण्यासाठी पुढाकार घेऊन, उद्योजक जमशेटजी टाटांना मार्गदर्शन केले. सन १९२३ ते १९५१ पर्यंत सतत २८ वर्षे ते या कंपनीचे संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांनी देशातील मोठ्या नद्या जोड प्रकल्प प्रस्ताव भारत सरकारला सादर केला होता. सन १९४१ मध्ये त्यांनी ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ही संघटना स्थापन केली. या संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सतत १३ वर्षे कार्य केले. सन १९५४ मध्ये वयाच्या ९४व्या वर्षी वृद्धापकाळामुळे त्यांनी राजीनामा दिला.त्यांनी बंगळुरू येथे प्रिमियर ऑटोमोबाईल कंपनी स्थापन केली आणि प्रिमियर कारचे उत्पादन सुरू केले. उद्योजक वालचंद हिराचंद यांच्या मदतीने त्यांनी बंगळुरू येथे हिंदुस्थान एरोनॉटिकल लिमिटेड (एचएएल) ही कंपनी स्थापन केली आणि विमान कारखाना सुरू केला. देशाच्या पंचवार्षिक योजनेची संकल्पना त्यांनी सन् १९२०मध्ये रिकन्स्ट्रक्टिंग इंडिया हे पुस्तक लिहून मांडली आणि सन् १९३४मध्ये प्लॅनिंग इकॉनॉमी ऑफ इंडिया हे पुस्तक लिहून, आर्थिक नियोजनावर त्यांनी आपले विचार प्रगट केले. सन १९४४ मध्ये नागपूर येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या वार्षिक अधिवेशनाला ते उपस्थित होते. त्यांना खालीलप्रमाणे पुरस्कार/पारितोषिके प्रदान करण्यात आलेली आहेत :-

१) कमांडर ईन इंजिनीअरिंग - ब्रिटिश सरकार,सन् १९११,

२) कर्नाटक कमांडर ईन इंडिया एम्पायर - ब्रिटिश सरकार, सन १९१५,

३) सर उपाधी - ब्रिटिश सरकार.

४) मानद आजन्म सदस्य – इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग (इंडिया), सन १९४४,

५) भारतरत्न उपाधी – भारत सरकार, सन १९५५,

६) दुर्गाप्रसाद खेतान स्मृती सुवर्णपदक – बंगाल रॉयल एशियाटिक सोसायटी, सन १९५८,

७) मानद सदस्यत्व – बंगळुरू येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सन १९५९,

८) जन्म शताब्दी पोस्ट तिकीट – भारत सरकार, सन १९६१,

९) मानद डॉक्टरेट पदवी– मुंबई, कोलकाता, बनारस, अलाहाबाद, पटना, म्हैसूर आदी विद्यापीठ.

मौक्षगुंडम विश्वेश्वरैय्यांनी सन् १९५१ मध्ये 'मेमरीज ऑफ माय वर्किंग ऑफ लाईफ' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. या महर्षी अभियंत्याने सन् १९६१ मध्ये वयाची शंभरी पूर्ण केली. या थोर जगविख्यात राष्ट्रीय महामानवाने १०० वर्षे ७ महिने एवढे प्रदीर्घ आयुष्य जगून, दि. १४ एप्रिल १९६२ रोजी बंगळुरू येथे अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या इच्छेनुसार मुद्देनहळ्ळी या त्यांच्या मूळ गावी त्यांचा कर्नाटक राज्याच्या इतमानाने धार्मिक व अंत्यसंस्कार विधी उरकण्यात आला. या महामानवाला त्रिवार मानाचा मुजरा...!

– प्रा. विजय गोविंदराव यंगलवार
निवृत्त विभागप्रमुख– इलेक्ट्रॉनिक्स. इंजि.
गव्हर्नमेंट पॉलिटेक्नीक,
नागपूर
भ्रमणध्वनी :९८५०३८६८४०/९०२२८९६५३०
e-mail - vijayyangalwar53gmail.com

(प्रा. विजय यंगलवार हे 'महर्षी अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या' या पुस्तकाचे लेखक आहेत.)

!! भावपूर्ण श्रद्धांजली !!



विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. त्रिविक्रम पांडुरंग बेंद्रे यांचे बुधवार दि. २६.०८.२०२६ रोजी आजारपणामुळे दुःखद निधन झाले. भारतीय स्टेट बँकेमध्ये शाखा व्यवस्थापक पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे श्री. त्रिविक्रम बेंद्रे, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सन २०१७ पासून विद्या प्रसारक मंडळाचे तहहयात सभासद म्हणून मंडळाच्या शैक्षणिक कार्यात सहभागी झाले. पुढे सन २०१८ साली ते मंडळाच्या कार्यकारिणी समितीचे सभासद नेमले गेले व सन २०१९ पासून मंडळाचे कोषाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. भारतीय स्टेट बँकेच्या व्यवहारानिमित्ताने श्री. बेंद्रे यांचे मंडळाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्याशी वैयक्तीक मैत्रीपूर्ण संबंध होते. सन २०१० साली, कार्याध्यक्ष डॉ. विजय वासुदेव बेडेकर यांच्या पुढाकाराने वेळणेश्वर येथे सुरू केलेल्या मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी भारतीय स्टेट बँकेकडून कर्ज मिळवून देण्यासाठी श्री. बेंद्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

परिसर वार्ता

– संकलित

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग



कार्तिक ठाकरे (६अ) यास टेबल टेनिस मध्ये प्रथम क्रमांक मिळाला असून, गोल्ड मेडल प्राप्त झाले.

आंतरराष्ट्रीय abacus स्पर्धेमध्ये शिवराज सुतार (६अ) हा १०० पैकी ९५ गुण मिळवून सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रकास पात्र ठरला.

'हर घर तिरंगा' अंतर्गत विविध उपक्रम – 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून 'हर घर तिरंगा' हा उपक्रम सुरू करण्यात आला. लोकांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करणे, तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढवण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या शाळेत दि. ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत शाळा स्तरावर खालील उपक्रम राबवले. इ.५वी वर्गांसाठी 'तिरंगा राखी बनवणे' ही स्पर्धा घेतली. तसेच इ. ६वी व ७वी च्या विद्यार्थ्याकडून तिरंगा भावनेचा गौरव करण्यासाठी भारतीय जवान व पोलिस कर्मचाऱ्यांसाठी 'पत्रलेखन' स्पर्धेतून कृतज्ञता व्यक्त केली. इ. ८वी, ९वी, १०वी तील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषवाक्य फलक घेऊन प्रभात फेरी काढली. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भाषण स्पर्धा व निबंध स्पर्धा देखील घेण्यात आल्या.

गेम चेंजर प्रोग्राम – दि.१३ ऑगस्ट रोजी LLF आणि MUFG गेम चेंजर प्रोग्राम मार्फत सर्व शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतली. हिलरी गोजी (सिटी मॅनेजर), ज्योती पवार (सिनियर ऑफिसर लाइफ स्कील कोर्स), प्राजक्ता पानसरे(स्पोर्ट्स कोच) या त्यांच्या प्रतिनिधींनी आज २१व्या शतकात विद्यार्थ्यांसाठी कोणकोणती कौशल्ये महत्त्वाची आहेत हे स्पष्ट केले. ही कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने इ.६वी, ७वी च्या विद्यार्थ्यांची DSO साठी मानसिक व शारीरिक तयारी कशी करून घेतली जाते याबद्दल माहिती दिली.

'प्रोजेक्ट अनसेड'– या संस्थेमार्फत विद्यार्थी जागरूकता व सुरक्षितता याबाबतीत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम घेतले जातात. दि.१४ ऑगस्ट रोजी या संस्थेमार्फत इ.५वी ते ८वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'गुड टच, बॅडटच' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी कायद्याचा अभ्यास केलेल्या पन्नासेट, नेहा जोशी, रिया तिवारी प्रतिनिधी म्हणून शाळेत उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल जागरूक करणे आणि कोणत्याही गैरप्रकारांची वेळेवर माहिती देण्याचे धाडस त्यांना देणे हा होता. केवळ व्याख्यान न देता त्यांनी कथा सांगून हा विषय अधिक रंजक केला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले, काही प्रश्नांची उत्तरे दिली आणि 'होय, नाही' या खेळाद्वारे त्यांनी चांगल्या वाईट स्पर्शांची उदाहरणे समजावून सांगितली.'नो म्हणजे नो असते', दुसऱ्याच्या 'NO' चा आदर करावयास हवा हेही त्यांनी सांगितले. त्यांचा फ्रेंडली दृष्टिकोन मुलांना जास्त आवडला. त्यांनी मुलांशी मित्रांसारखे बोलून त्यांच्यातील भीती दूर केली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले व आपले अनुभव शेअर केलेत. पुढे येऊन गाणी, गोष्टी देखील म्हटली. या संपूर्ण कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी सर्व मुलांना 'आत्मविश्वासाने राहा आणि नेहमी सुरक्षित रहा' असा

सल्ला दिला. सौ. सोनवणे बाईंनी त्यांचे आभार मानले व असे उपयुक्त कार्यक्रम शाळेत घेण्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

पर्यावरण दक्षता मंच, ठाणे – पर्यावरण दक्षता मंच, ठाणे यांच्यातर्फे इ. ७वी अ च्या विद्यार्थ्यांसाठी 'माझा तलाव, माझी जबाबदारी' या विषयावर १५ ऑगस्ट रोजी मासुंदा तलाव येथे कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमास पर्यावरण दक्षता मंचाची संपूर्ण टीम, पर्यावरण दक्षता मंचाचे सर्वेसर्वा मान. श्री. विद्याधर वालावलकर, तसेच सुरभी वालावलकर या देखील उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमास ठाणे जिल्हा आयुक्तांनीही भेट दिली. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तलाव वाचवण्यासाठी सध्याच्या पिढीची जबाबदारी काय आहे, तलावांचे फायदे इत्यादी विषयांवर माहिती दिली. त्यानंतर संपूर्ण तलावाभोवती प्रभात फेरीही काढण्यात आली.



हस्तलिखित आणि भित्तीपत्रिका प्रकाशन



शाळेची परंपरा असलेला 'हस्तलिखिते आणि भित्तीपत्रके' प्रकाशन सोहळा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे यंदाही १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त बेडेकर महाविद्यालयाच्या विशाल प्रांगणात पार पडला. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या शुभ हस्ते या उपक्रमाचे प्रकाशन झाले.

हस्तलिखितांचे विविध विषय खालीलप्रमाणे :

इ.५वी– श्रावणातील सण

इ.६वी– महाराष्ट्रातील नद्या आणि धरणे

इ.७वी– विठ्ठल भक्ती संप्रदायातील स्त्री संत

इ.८वी– तारपा वादक पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा यांचा गौरवशाली प्रवास

इ.९वी– अन्न : तारक की मारक? अन्नसुरक्षा, अन्नभेसळ, परिणाम व ग्राहक जागृती

इ.१०वी– साहित्यिक अभिवादन– ज्ञान आणि संस्कार

भित्तीपत्रिकांचे विषय खालीलप्रमाणे –

मराठी – आविष्कार – व्युत्पत्ती कोश आणि त्याचा वापर

हिंदी – नवनीत – कवयित्री महादेवी वर्मा

इंग्रजी– BUDS AND FLOWERS– क्रिकेटर रोहित शर्मा

विज्ञान – पेट्रोल की इथनोलयुक्त पेट्रोल

विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शैक्षणिक संस्थां–मधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.

गुरूवंदन व छात्र अभिनंदन – भारत विकास परिषद, वसंत विहार शाखेच्या वतीने दि. २१ ऑगस्ट रोजी शाळेमध्ये 'गुरूवंदन व छात्र अभिनंदन' कार्यक्रमाचा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात इ. ५वी ते १०वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच शाळेतील अनुभवी शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. सन्मानित विद्यार्थ्यांमध्ये इ.५वी तील स्वराज समीर पायगुडे, इ. ६वीतील मृण्मयी प्रशांत लंके व अभिनंदन पंकज शिरसाट, इ. ७वीतील ग्रंथा सचिन गोरीवले व सिद्धांत सुरेश आमले, तसेच इ. ८वी

ते १०वी मधून शरण्या गणेश जगदाळे, गौरी संतोष भोर, सोहम कविता दिनेश शिंदे, लतेश स्वप्नील तेलंग आणि राज नथुराम खाडे यांचा समावेश होता.

याचबरोबर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना वाघुले, सहाय्यक शिक्षक श्री. प्रवीण खैरनार आणि सहाय्यक शिक्षिका सौ. सुचिता शेलार यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन विशेष सन्मानाने गौरविण्यात आले.





ज्ञान प्रबोधिनी, ठाणे

बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी संवादिनीच्या प्रतिनिधी सौ. मुग्धा मुळ्ये, विद्या खिस्ती, मनीषा जोशी यांनी 'शालेय प्रतिज्ञा–अर्थ आणि इतिहास' या उपक्रमा अंतर्गत इ. ६वी आणि ७वीच्या एकूण ४१७ विद्यार्थ्यांसाठी सत्र आयोजित केले होते.

या सत्रात त्यांनी प्रतिज्ञा या शब्दाचा अर्थ, राष्ट्रीय प्रतिज्ञेचा इतिहास, प्रतिज्ञेचे महत्त्व थोरामोठ्यांची उदाहरणे, गोष्टी सांगून स्पष्ट केले. विद्यार्थ्यांचा सक्रिय आणि उत्स्फूर्त प्रतिसाद खूप उत्साहवर्धक होता.

वेंडिंग मशीन उद्घाटन

शाळेमध्ये पहिल्या मजल्यावरील मुलींच्या शौचालयात सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व डिस्पोजल मशीन लावण्यात आलेले आहे. दि. २२ ऑगस्ट रोजी मशीनच्या उद्घाटनाचा समारंभ मान. सौ. सुमेधा बेडेकर यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी माजी विद्यार्थी संस्थेचे कार्यकारी सभासद, मान. उपमुख्याध्यापिका सौ. बोऱ्हाडे, सौ. कुमावत देखील उपस्थित होत्या. उद्घाटनानंतर मशीन मुलींच्या वापरासाठी लगेचच खुली करण्यात आली. मशीन वापराबाबतच्या सर्व सूचना मुलींना परिपाठादरम्यान देण्यात आल्यात.

विद्यार्थी बचत बँक उद्घाटन

विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून बचतीची सवय रुजावी, पैशांचे नियोजन समजावे, या दृष्टीने इ. ६वी ब च्या विद्यार्थ्यांसाठी वर्गशिक्षिका सौ. साधना जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी बचत बँक हा अभिनव उपक्रम वर्षभरासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी वत्सला मूल्यशिक्षण केंद्राच्या संस्थापिका सौ. सुमेधा बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या उपक्रमातून खात्यात रक्कम जमा करणे, रक्कम काढणे, हिशोब ठेवणे, नोंदवही लिहिणे, आर्थिक व्यवहारांच्या नोंदी ठेवणे अशा विविध कामांचा अनुभव विद्यार्थी स्वतः घेतील. उद्घाटन समारंभ वेळी उपमुख्याध्यापिका सौ. सुषमा बोऱ्हाडे, पर्यवेक्षिका मीनाक्षी मलिये, वर्गशिक्षिका सौ. साधना जोशी, कलाशिक्षक श्री .विलास कोळी व प्रमुख पाहुण्या पत्रकार प्रज्ञा सोपारकर, पत्रकार सारिका साळुंखे, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष अभिजीत जाधव, उपाध्यक्ष किरण नाकती, कविता परब, पंकज म्हात्रे, वदांत कोळी, अमेय बीडये, संतोष शिरसाठ व माजी शिक्षक दीपक धोंडे यांच्यासोबत सहावी ब चे विद्यार्थी आणि पालक वर्ग उपस्थित होते.

गारद फाऊंडेशन गणपती कार्यशाळा

पर्यावरणास पूरक अशा उत्सवांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता जोपासण्यासाठी शनिवार दि. २२ ऑगस्ट रोजी 'गारद फाऊंडेशन' तर्फे इ.५ वी, ६वी, ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'इको फ्रेंडली गणेश मूर्ती' कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू मूर्तीपासून आकर्षक, सुबक अशा मूर्त्या तयार केल्या.

अथर्वशीर्ष पठण – हिंदू जागृती मंडळ, ठाणे यांच्या वतीने इ. ५वी, ६वी, ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी अथर्वशीर्ष पठण घेण्यात आले.

ज्ञान प्रबोधिनी – ज्ञानप्रबोधिनी मार्फत इ.७ वीअ च्या विद्यार्थ्यांसाठी दर शनिवारी उपक्रम घेतले जातात. या शनिवारी प्रतिनिधींनी मुलांना सजावटीसाठी कागदी फुले, तसेच पानांचे तोरण कसे तयार करायचे याची कार्यशाळा घेण्यात आली.

सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

पतेती – पतेतीच्या माध्यमातून प्रेम, शांतता आणि सद्भावनेचा संदेश!

विद्यार्थ्यांना विविध धर्मांच्या सणांची माहिती मिळावी, त्यातून प्रेम, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाची मूल्ये रुजावीत या उद्देशाने शाळेच्या प्राथमिक विभागात पतेती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय वातावरणात झाली. विद्यार्थ्यांना पतेती म्हणजे काय, पारशी समाजासाठी या दिवसाचे महत्त्व आणि त्यांच्या संस्कृतीतील परंपरा याविषयी सोप्या भाषेत माहिती देण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रेम, शांतता, क्षमा, दया आणि एकोपा यांसारख्या जीवनमूल्यांचा संदेश दिला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक धर्माचा आणि संस्कृतीचा आदर करण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

पतेतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना विविधतेत एकता हीच आपल्या संस्कृतीची खरी ताकद आहे, हा सुंदर संदेश मिळाला. आनंदी व प्रसन्न वातावरणात पार पडलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि संस्मरणीय ठरला.

१५ ऑगस्ट – देशभक्तीच्या उत्साहात स्वातंत्र्यदिनाचा जल्लोष!

देशाच्या स्वातंत्र्याचा गौरव आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या प्राथमिक विभागात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, देशभक्तीपर कविता, समूहगीते आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाची आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याची माहिती मनोगत व सादरीकरणातून व्यक्त केली. देशभक्तीपर गीतांवरील नृत्य आणि समूह सादरीकरणांनी कार्यक्रमात उत्साहाची भर पडली. विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून देशभक्तीपर नारे दिले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम, एकता, शिस्त आणि जबाबदार नागरिकत्वाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले.

''स्वातंत्र्याचा अभिमान, देशसेवेचा संकल्प!'' या संदेशाने स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

नागपंचमी – ''निसर्गाशी नाते जोडू या, जीवसृष्टीचे रक्षण करू या!''

शाळेच्या प्राथमिक विभागात नागपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील सणांचे महत्त्व समजावे, तसेच सर्पांविषयी असलेले गैरसमज दूर होऊन त्यांच्याबद्दल प्रेम व संवेदनशीलता निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात नागपंचमीची महत्त्वाची माहिती देऊन झाली.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना, 'सर्प हे निसर्गातील महत्त्वाचे घटक असून त्यांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे', हे समजावून सांगितले. 'साप दिसल्यास त्यांना इजा न करता सुरक्षित अंतर ठेवावे आणि प्रशिक्षित

व्यक्ती किंवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाची मदत घ्यावी', असा सुरक्षिततेचा संदेशही देण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम आनंददायी आणि ज्ञानवर्धक ठरला. निसर्गाचा सन्मान, जीवसृष्टीचे संरक्षण हा सुंदर संदेश देत नागपंचमी उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन – एक सण निसर्गाचा, एक सण नात्यांचा!

शाळेच्या प्राथमिक विभागात नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन उत्साहात साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील सणांचे महत्त्व समजावे, आपल्या परंपरांची ओळख व्हावी तसेच प्रेम, आपुलकी आणि बंधुभावाची भावना रुजावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात नारळी पौर्णिमेचे महत्त्व सांगून झाली. विद्यार्थ्यांना कोळी बांधवांची परंपरा, समुद्राशी असलेले त्यांचे नाते आणि नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करण्याची प्रथा याविषयी माहिती देण्यात आली.

यानंतर रक्षाबंधनाचा भावपूर्ण सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्या बांधून प्रेम, काळजी आणि परस्पर सन्मानाचा संदेश दिला. राखी बनविणे, शुभेच्छापत्र तयार करणे अशा कृतीआधारित उपक्रमांतही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



दोन्ही सणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परंपरा जपण्यासोबतच निसर्गप्रेम, बंधुभाव, सहकार्य आणि कृतज्ञता यांसारखी जीवनमूल्ये शिकण्याची संधी मिळाली. आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेला हा उत्सव विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व संस्मरणीय ठरला.

नो बॅग डे – शाळेत आयोजित करण्यात आलेल्या 'नो बॅग डे' निमित्त विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, कलात्मक आणि कृतीशील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणपतीची मूर्ती व आकर्षक तोरण तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून गणपतीची मूर्ती कशी तयार करावी, तिचा आकार कसा द्यावा व सुंदर सजावट कशी करावी, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रंगीत कागद, फुले, मणी, सजावटीचे साहित्य यांचा वापर करून सुंदर गणेशोत्सवी तोरण तयार करण्याची कला विद्यार्थ्यांनी शिकली.



स्वतःच्या हाताने गणपतीची मूर्ती आणि तोरण तयार करताना विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कल्पनाशक्तीला, हस्तकौशल्याला आणि कलात्मकतेला वाव मिळाला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ कलाकुसर शिकता आली नाही, तर पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेशही मिळाला. नेहमीच्या पुस्तकांपासून दूर जाऊन कृतींतून आणि अनुभवांतून शिकण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

सध्या सर्व ठिकाणी गणेशउत्सवाचे वारे वाहात आहेत. मग त्याला शाळा तरी कशा अपवाद ठरतील! अगदी दोन तासांच्या मध्ये मिळालेल्या इवल्याशा वेळातही मुले त्यांच्या स्केच बुक्समध्ये त्यांना आवडणाऱ्या, भावणाऱ्या बाप्पांचे चित्र काढण्यात रंगून गेलेली दिसत आहेत. शाळेतील वातावरणही असेच गणेशमय झालेले दिसले.

गणेशोत्सव हा उत्सव राज्याच्या सांस्कृतिक मंत्रालयाने 'राज्य महोत्सव' म्हणून जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या प्रदूषण नियंत्रण कक्षाने सर्व शाळांमध्ये शाडूच्या मातीचे गणपती बनविण्याचा उपक्रम राबविण्याची सूचना शाळांना दिली होती. त्यासाठी त्यांनी शाडूच्या मातीचे शाळा-शाळांमध्ये निःशुल्क वाटपही केले.

आज शाळेतील हस्तकलेचा तास मुलांच्या प्रिय गणोबांचा तास झाला. श्री. साखरकर सरांनी मुलांना प्रथम एक गणेशमूर्ती घडवून दाखवली. मग काय ! त्यातून स्फूर्ती घेऊन, स्वतःची प्रतिभा वापरून मुलांनी गणेशमूर्ती साकारल्या. प्रत्येकाचा प्रयत्न मूर्तीला सुबकपणा देण्याचा होता.





या उपक्रमाबद्दल बोलताना साखरकर सर म्हणाले, 'मूर्ती साकारताना मुलांमध्ये असणाऱ्या धीरवृत्तीचे (patience) नव्यानेच दर्शन घडले. एरवी मुले म्हणजे मस्तीच करणार असा आपला समज असतो, पण तो या मुलांनी खोटा ठरवला'.

सरांनी मुलांना दाखविलेल्या मूर्तीच्या मूळ ढाच्याचा अवलंब करीत मुलांनी स्वतःचेही काही प्रयोग केले. मूर्तीची वस्त्रप्रावरणे, अलंकार यांमध्ये वैविध्य दिसले. मुलांनी तयार केलेल्या मूर्ती पूर्णपणे सुकल्या की पुढील तासाला त्यांचे रंगकाम करण्यात येईल.

त्या दिवशी शाळा सुटल्यावर प्रत्येक मुलाच्या हाती त्याची स्व-निर्मित गणेशमूर्ती पाहताना मुले, पालक, आणि शिक्षक हरखून गेले.

शाळांमध्ये पर्यावरणपूरक गणपतीउत्सव करून त्याबाबत जनजागृती करण्याचा ठाणे महानगरपालिकेचा उद्देश शाळेत पूर्णत्वाला गेल्याचे दिसून आले.

शाळेत भारत-इस्रायल यांच्यात शैक्षणिक – सांस्कृतिक देवाणघेवाण

७ सप्टेंबर २०२६ रोजी शाळेत इस्रायलहून आलेल्या युवल, याएल, लाओर, आदिर आणि गाली या तरुण पाहुण्यांचे पारंपरिक पद्धतीने आणि लेझीमच्या उत्साही सादरीकरणाने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांचे बहारदार सांस्कृतिक सादरीकरण आणि आकर्षक सजावट पाहून इस्रायली पाहुणे भारावून गेले.



पुढील तीन दिवसांत या पाहुण्यांनी विविध वर्गांना भेटी दिल्या, विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला आणि आपल्या संस्कृती व जीवनशैलीविषयी माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना हिब्रू आणि भाषा, इस्रायलचे राष्ट्रीय खेळ, लष्करी सेवेची परंपरा तसेच शॉरमा आणि फलाफल यांसारख्या लोकप्रिय खाद्यपदार्थांची ओळख करून दिली. इस्रायली संगीताच्या तालावर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत

ताल धरला आणि एका सर्जनशील उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांचा व ध्येयांचा विचार करण्यास प्रेरित केले.

या भेटीदरम्यान पाहुण्यांनी भारतीय संस्कृती, खाद्यसंस्कृती आणि नृत्यप्रकार, विशेषतः गरब्याविषयी विशेष आवड व्यक्त केली. आपल्या भेटीची कायमस्वरूपी आठवण म्हणून त्यांनी शाळेच्या भिंतींवर सुंदर चित्रे साकारली, जी दोन्ही देशांमधील आनंद आणि सौहार्दाचे प्रतीक ठरली.

पाहुण्यांना भारतीय मेंदी कलेचा अनुभव घेण्याची संधीही मिळाली. शाळेतील विद्यार्थिनींनी त्यांच्या हातांवर सुबक मेहंदी रेखाटली, ज्यामुळे त्या सर्वांना विशेष आनंद झाला.



११ सप्टेंबर रोजी पारंपरिक वेशभूषेत काढण्यात आलेल्या गणपती स्वागत मिरवणुकीत पाहुण्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि या अविस्मरणीय अनुभवाने त्यांच्या सांस्कृतिक दौऱ्याला विशेष रंगत आणली. त्यानंतर शाळेच्यावतीने त्यांना प्रेमपूर्वक निरोप देण्यात आला.

या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. विजय बेडेकर, डॉ. महेश बेडेकर आणि सदस्य श्री. रसाळ यांनी पाहुण्यांचे स्वागत करून भारत-इस्त्रायल संबंध अधिक दृढ करण्याविषयी महत्त्वपूर्ण चर्चा केली. मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून पाहुण्यांना स्मृतिचिन्हे प्रदान केली आणि या समृद्ध सांस्कृतिक देवाणघेवाणीचा समारोप संस्मरणीय रित्या करण्यात आला.



जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम

७ ऑगस्ट, २०२६ रोजी डॉ. भावना देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजना व पर्यावरण समितीच्या वतीने importance of Mangroves या विषयावर डॉ. शितल पाचपांडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. शितल पाचपांडे यांचे हे व्याख्यान अतिशय उत्कृष्ट माहिती देणारे ठरले. या व्याख्यानास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

८ ऑगस्ट, २०२६ रोजी पालक शिक्षक असोसिएशनच्या वतीने विद्यार्थी व पालकांसाठी दिशा निर्देशन (Orientation) च्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ११वीचे कला व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी यांना महाविद्यालयाच्या शैक्षणिक पद्धती संदर्भात व शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी नियमावली उपप्राचार्य अंजली पुरंदरे यांनी सांगितली. शैक्षणिक वर्ष हे शिस्त, नियम, अभ्यास व सूचनांचे पालन अमलात आणल्यावरच निकाल व व्यक्तिमत्त्व यात सकारात्मक बदल होतो ह्या विचारांचे आदानप्रदान केले.

मेजर, पर्यवेक्षक माधवी जोशी यांनी शैक्षणिक परीक्षा पद्धत व विषय गुणांचे तक्त्यातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पालकसभेत पालकांशी चर्चा करताना पालक व विद्यार्थी यांच्यात संवाद हवा, विद्यार्थी हे नेमके काय करतात याकडे पालकांचे लक्ष हवे असे उपप्राचार्य अंजली पुरंदरे यांनी सुचित केले. 'महाविद्यालय व शाळा यात फरक असून; महाविद्यालयातील नियम,

विविध उपक्रमात सहभागी होऊन जीवनात सकारात्मक बदल करा' असा मार्मिक उपदेश हा त्यांनी केला.

१० ऑगस्ट, २०२६ रोजी इयत्ता अकरावी आर्ट्स-A आणि अकरावी कॉमर्स-E मधील नऊ विद्यार्थ्यांनी फ्रेंच विषयाच्या शिक्षिका सायली वैद्य यांच्या सोबत जुहू येथील पृथ्वी रंगभूमीला भेट दिली त्यावेळी त्यांनी रोहन टिल्लू लिखित आणि मानसी नाटेकर यांच्या प्रमुख भूमिकेतील 'मिसेस फिटर' हे नाटक पाहिले. विद्यार्थिनींसाठी हा केवळ नाटकाचा अनुभव नव्हता, तर रंगभूमीच्या माध्यमातून इतिहास स्त्री-ष्टी आणि मानवी भावविश्व समजून घेण्याचा एक वेगळा अनुभव होता.

११ ऑगस्ट, 'रेशीम धागा विणकाम' वर्कशॉपचे आयोजन केले. विद्यार्थ्यांचा सहभाग कौतुकास्पद होता.

१४ ऑगस्ट, २०२६ रोजी महाराष्ट्र सरकारच्या समितीच्या वतीने 'हर घर तिरंगा' या शीर्षकाखाली विविध उपक्रम कनिष्ठ महाविद्यालयात राबविण्यात आले कनिष्ठ महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा दल यांच्या संयुक्त विद्यमाने कला वाणिज्य विज्ञान शाखेच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय सणांची रॅली आयोजित केली होती भारतीय राष्ट्रीय झेंडा हातात घेऊन राष्ट्रीय सणाचे अभिमानाची घोषवाक्य मुखातून काढत ही रॅली आकर्षणाचा विषय ठरली.

राष्ट्रीय घोषणांचा आवाज महाविद्यालयाच्या परिसरात पसरला होता या रॅलीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक उपप्राचार्य सौ. अंजली पुरंदरे पर्यवेक्षक माधवी जोशी व सरकार समिती सदस्य शिक्षक व महाविद्यालयातील शिक्षक उत्साहाने सहभागी झाले होते. 'राष्ट्रीय सण' विषय रांगोळी स्पर्धेसाठी देण्यात आला होता १८ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

'हर घर तिरंगा' या शीर्षकांतर्गत 'पोस्टर मेकिंग स्पर्धा' घेण्यात आली विद्यार्थ्यांनी उत्साहाने या स्पर्धेत सहभाग घेतला राष्ट्रीय सणांची कला सादर केली जणू त्यांच्या युवा विचारांचे ते प्रतिबिंब होते.

सरकारी समितीच्या वतीने 'हर घर तिरंगा' अंतर्गत पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेसाठी राष्ट्रीय सण कल्पनाविस्तार विषय देण्यात आले होते विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, कलाविष्कार आनंदात पार पडला.

१९ ऑगस्ट, २०२६ रोजी सरकारी कमिटीच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली राष्ट्रीय सणांचे विविध विषय स्पर्धेसाठी देण्यात आले होते २३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

२२ ऑगस्ट, २०२६ रोजी समुपदेशक मनाली भालेराव यांचे 'नशामुक्ती' व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२५ ऑगस्ट, २०२६ रोजी अतुल्य सेल या कमिटीच्या वतीने डॉ. भावना देशमुख यांनी विद्यार्थ्यांना बँकेचे व्यवहार बँक पद्धत समजावी या हेतूने विद्यार्थ्यांसाठी 'बँकेला भेट' हा उपक्रम आयोजित केला विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा खूप फायदा झाला.

२५ ऑगस्ट, २०२६ रोजी युवा शिल्प व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने 'पुस्तक तुमच्या भेटीला' या कार्यक्रम राबविण्यात आला विद्यार्थ्यांनी नवीन नवीन पुस्तके वाचावीत व विद्यार्थी वाचनाशी जोडले जावेत या हेतूने हा उपक्रम हाती घेण्यात आला. एकूण ४५ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले. विविध प्रकारच्या पुस्तकाचे वाचन विद्यार्थ्यांनी केले व पुस्तकाचे परीक्षण लिहून सादर केले.

युवाशिल्प व कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने 'पुस्तक वाचन' घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली.

Poetry by skillopedians या कमिटीच्या वतीने उपप्राचार्य सौ. अंजली पुरंदरे यांनी विद्यार्थ्यांकडून कविता लिहून घेतल्या व त्याची छान पीडीएफ तयार केली. विद्यार्थ्यांनी या उपक्रमास उत्तम प्रतिसाद दिला. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

२९ ऑगस्ट, रोजी 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' साजरा करण्यात आला. फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

२९ ऑगस्ट, रोजी 'श्रावण सरी' या माजी विद्यार्थ्यांचा संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते हा कार्यक्रम उत्कृष्ट झाला.

वाणिज्य पदवी महाविद्यालयाचे कार्यक्रम

महाविद्यालयातील NSS विभागातर्फे 'विकसित भारत युवा कनेक्ट कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम २३ जुलै २०२६ रोजी कात्यायन सभागृहात पार पडला. या कार्यक्रमासाठी अमितेश बी. तामणे हे संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. एकूण १५७ विद्यार्थ्यांनी आणि ९ शिक्षकांनी सहभाग घेतला. युवकांमध्ये अमली पदार्थ व व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच निरोगी, जबाबदार आणि व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. शारीरिक व मानसिक आरोग्य, सकारात्मक मूल्ये, नेतृत्वगुण आणि समाजातील सहभाग वाढवून विद्यार्थ्यांना 'विकसित भारता'च्या संकल्पनेत सक्रिय योगदान देण्यासाठी प्रेरित करण्यात आले.

पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी कात्यायन सभागृहात आयोजित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात एकूण १६० विद्यार्थी, त्यामध्ये एम.कॉम.चे ८२ आणि एम.ए.चे ७८ विद्यार्थी सहभागी झाले. या समारंभाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करणे, त्यांना भविष्यात उत्कृष्टतेचा ध्यास घेण्यासाठी प्रेरित करणे आणि संस्थेच्या शैक्षणिक परंपरेचा सन्मान राखणे हा होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. विजय बेडेकर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा पदव्युत्तर पदवीदान समारंभ पार पडला. मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरी करत समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. समारंभामुळे पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये अभिमान, जबाबदारी आणि प्रेरणेची भावना निर्माण झाली आणि संस्थेच्या मूल्य व परंपरांचा गौरव करत हा सोहळा संस्मरणीय ठरला.

एन.एस.एस. विभागातर्फे आणि 'स्नेह फाऊंडेशन'च्या सहकार्याने मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी कॉलेजच्या प्रांगणात 'मान्सूनच्या आजारांवर सत्र' आयोजित करण्यात आले होते. श्री. अमन गोहिया यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यू, मलेरिया, टायफाईड यांसारख्या पावसाळ्यातील आजारांची कारणे, लक्षणे आणि बचावाचे उपाय याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी जागरूक करणे हा यामागील उद्देश होता. या सत्रात एकूण ५९ विद्यार्थी झाले होते.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे (DLLE) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० अंतर्गत NEP सप्ताह २०२६ च्या निमित्ताने २९ जुलै २०२६ रोजी अन्न महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत महाविद्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील कॉरिडॉरमध्ये झालेल्या या उपक्रमात डॉ. संगीता मोहंती यांच्या मार्गदर्शनाखाली ५ शिक्षक आणि २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक व प्रादेशिक खाद्यपदार्थ तयार करून त्यांचे सादरीकरण केले. भारतीय खाद्यसंस्कृतीतील वैविध्य, आरोग्यदायी आहाराच्या सवयी तसेच उद्योजकतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, संघभावना, संवादकौशल्य, सांस्कृतिक जाणीव, तसेच नियोजन, सादरीकरण आणि जबाबदार अन्नव्यवस्थापनाच्या कौशल्यांना चालना मिळाली. अनुभवाधारित शिक्षण, प्रत्यक्ष कृतीतून ज्ञान आणि विद्यार्थ्यांमधील सहकार्य यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

NEP सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयातील विविध विभागांनी पिअर लर्निंग – बेटर अंडरस्टँडिंग या उपक्रमाचे २९ जुलै रोजी आयोजन केले होते. बीबीए, बँकिंग आणि इन्शुरन्स, बी एफ एम, इंग्रजी, बीएएमएमसी, तत्त्वज्ञान, एम. कॉम. अकाउंटन्सी, इतिहास, वाणिज्य, अर्थशास्त्र, बीएमएस, बीबीएम, संस्कृत, राज्यशास्त्र अशा विविध विभागांनी हा उपक्रम यशस्वीपणे घेतला. तसेच NEP वीक संदर्भात विभागीय पातळीवर प्रश्न मंजुषा, व्याख्याने, पोस्टर मेकिंग स्पर्धा, माहितीपट दाखवणे अशा वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन केले गेले.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या (DLLE) वतीने मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने 'नशामुक्त महाराष्ट्र' घोषवाक्य अभियानाचे आयोजन गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थ व विविध प्रकारच्या व्यसनांच्या घातक परिणामांविषयी जनजागृती करणे, तसेच निरोगी आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांनी प्रभावी घोषवाक्यांच्या माध्यमातून 'नशामुक्त महाराष्ट्र' चा संदेश दिला. त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व अधोरेखित करणारे विचार मांडले.

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ अंतर्गत भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) विभागाच्या वतीने गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी खघड विषय अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस एकूण १३ प्राध्यापक उपस्थित होते. बैठकीत IKS अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन व अद्ययावतीकरण, विषयवस्तूमध्ये आवश्यक भर, तसेच अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी अर्धदिवसीय शिक्षक कार्यशाळेचे आयोजन याबाबत चर्चा करण्यात आली. IKS मधील महत्त्वपूर्ण संज्ञांचा प्रादेशिक भाषा व इंग्रजी भाषेतील शब्दकोश तयार करण्याची जबाबदारी डॉ. विनोद चांदवाणी व सौ. स्वाती भालेराव यांच्यावर सोपविण्यात आली. तसेच हस्तलिखिते, पारंपरिक ग्रंथ व संशोधनपद्धतींचा परिचय व्हावा यासाठी ओरिएंटल स्टडी सेंटरला भेट देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. भारतीय ज्ञानाचे जतन व प्रसारण यामध्ये बहुभाषिकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली IKS मधील बहुभाषिकतेसंदर्भात संकल्पनात्मक टिपण तयार करण्याचे ठरविण्यात आले.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाविद्यालयाच्या' राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्यावतीने 'पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण' या उपक्रमांतर्गत रविवार, २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत बदलापूर येथील नवदुर्गा वृद्धाश्रम येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व अधोरेखित करणे, हरित व निरोगी पर्यावरणाबाबत जनजागृती करणे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमात NSS विभागातील एकूण १९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वृक्षारोपणातून जैवविविधतेचे संवर्धन, हवेची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच शाश्वत विकासासाठी समाजातील सहभाग वाढविण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरणपूरक आणि हरित भविष्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ अंतर्गत प्रशासकीय टीमतर्फे गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ए-३०४, आर्ट्स बिल्डिंग येथे 'स्मार्ट बोर्ड'चे उद्घाटन करण्यात आले. डॉ. महेश बेडेकर यांच्या हस्ते, प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी डॉ. सागर ठक्कर आणि डॉ. कप्तान कुशवाह यांनी स्मार्ट बोर्डचे प्रात्यक्षिक सादर केले. या

उपक्रमात एकूण ७३ विद्यार्थी आणि ८ शिक्षक सहभागी झाले होते. आधुनिक अध्यापन व सहकार्याला चालना देण्यासाठी वर्गखोल्या आणि बैठकांच्या जागा परस्परसंवादी व तंत्रज्ञानसक्षम साधनांनी सुसज्ज करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या उपक्रमामुळे शैक्षणिक उत्कृष्टतेशी सुसंगत भविष्याभिमुख स्मार्ट कॅम्पस उभारण्याच्या दिशेने महाविद्यालयाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

११ ऑगस्ट २०२६, मंगळवार रोजी राज्यशास्त्र समितीच्या वतीने व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमांतर्गत (VSC) 'मॉक इलेक्शन्स २०२६' या उपक्रमाचे आयोजन जिमखाना येथे करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेचा अनुभव मिळावा, मतदानाची प्रक्रिया, निवडणूक व्यवस्थापन तसेच मुक्त व निष्पक्ष निवडणुकीचे महत्त्व समजावे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. तसेच विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांविषयी जाणीव निर्माण करून त्यांना जबाबदार नागरिक म्हणून लोकशाही प्रक्रियेत माहितीपूर्ण व सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मतदानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने लोकशाही प्रक्रियेचे महत्त्व अधिक प्रभावीपणे समजण्यास मदत झाली.

लेखापरीक्षणाचा पहिला टप्पा (Internal Audit Phase-I) १०, १३ आणि १४ ऑगस्ट २०२६ रोजी Cdr. राजेंद्र आगरकर यांच्या मार्फत प्रशासन, मानव संसाधन, खरेदी, परीक्षा व मूल्यमापन, IQAC आणि MR या विभागांसाठी घेण्यात आला. ISO 9001:2015 मानकांनुसार गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली (QMS) ची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे की नाही, याचे निरीक्षण करण्याच्या प्रक्रियेचा हा एक भाग होता.

मंगळवारी, १८ ऑगस्ट २०२६ रोजी स्पर्धा परीक्षा कक्षाच्या वतीने 'Teach to Triumph: The IPS Journey' या विषयावर आयपीएस अधिकारी अंकिता अनिल पाटील (AIR 140, UPSC CSE 2025) यांच्या मार्गदर्शनाखाली संवादात्मक अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कात्यायन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास १४६ विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. यूपीएससी नागरी सेवा परीक्षा, तसेच इतर स्पर्धात्मक परीक्षांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, शिस्तबद्ध तयारी व नियमित अभ्यासाचे महत्त्व समजावून देणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि संवादकौशल्य विकसित करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. व्याख्यानातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली.

NEP अंमलबजावणी समिती आणि तत्त्वज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय ज्ञान प्रणालीतील (IKS) अध्यापनशास्त्रीय आव्हाने' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी कॉन्फरन्स रूममध्ये करण्यात आले. याप्रसंगी Director of SIES महाविद्यालयाच्या डॉ. उमाशंकर या प्रमुख पाहुण्या महणून उपस्थित होत्या. अर्चना डोईफोडे, डॉ. मृण्मयी थत्ते आणि सुप्रिया मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेस एकूण १४ शिक्षक सहभागी झाले होते. भारतीय ज्ञान प्रणालीचे प्रभावी अध्यापन करण्यासाठी आवश्यक अध्यापन पद्धती, उच्च शिक्षणात IKS च्या समावेशातील अध्यापनशास्त्रीय आव्हाने तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०च्या अनुषंगाने IKS ची प्रभावी अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन करणे हा कार्यशाळेचा उद्देश होता. पारंपरिक भारतीय ज्ञान आधुनिक शिक्षणपद्धतीत प्रभावीपणे समाविष्ट करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सहभागी शिक्षकांनी चर्चा केली तसेच विविध व्यावहारिक अडचणी, अनुभव व दृष्टिकोन मांडत IKS आधारित शिक्षण अधिक अर्थपूर्ण व समकालीन करण्याच्या उपायांचा ऊहापोह केला.

दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी IQACच्या वतीने 'FDPs/ अल्पकालीन अभ्यासक्रम/ कार्यशाळा/

प्रशिक्षणातून प्राप्त ज्ञानाचे आदान-प्रदान' या विषयावर ज्ञानवाटप सत्राचे आयोजन करण्यात आले. कात्यायन येथे झालेल्या या सत्रात एकूण ५४ शिक्षकांनी सहभाग घेतला. विविध ठिकाणी आयोजित FDP, अल्पकालीन अभ्यासक्रम, कार्यशाळा व प्रशिक्षणांमधून शिक्षकांनी मिळवलेल्या ज्ञानाचा परस्परांमध्ये प्रसार करणे तसेच अध्यापन प्रक्रियेत त्याचा व्यावहारिक वापर कसा करता येईल, याबाबत अनुभवांची देवाणघेवाण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सहभागी शिक्षकांनी आपल्या प्रशिक्षणातील महत्त्वपूर्ण बाबी व अनुभव मांडून त्यांची अध्यापनात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या पद्धती स्पष्ट केल्या. या ज्ञानवाटप सत्राला उपस्थित शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

एम.कॉम.(अकाउंटिंग अँड फायनान्स) विभागातर्फे २० ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'डेटा ॲनालिसिस अँड स्टॅटिस्टिकल टेक्निक्स' या विषयावर तीन दिवसीय संशोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. गुरुवार ते शनिवार मध्ये कात्यायन येथे झालेल्या या कार्यशाळेसाठी डॉ. केयूरकुमार एम. नायक आणि प्रा. अजय वासुदेव सराफ हे संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. कार्यशाळेत ९ शिक्षकांसह एकूण ९६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व सांख्यिकी कौशल्ये विकसित करणे, संशोधन पद्धती, प्रश्नावली तयार करणे, लिकर्ट स्केल, गृहीतक चाचणी आणि सांख्यिकीय तंत्रांचे व्यावहारिक ज्ञान देणे, तसेच योग्य सांख्यिकीय चाचण्यांची निवड, माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्णयन करून संशोधनातून अर्थपूर्ण निष्कर्ष काढण्याची क्षमता वाढवणे हा कार्यशाळेचा उद्देश होता. संवादात्मक सत्रे व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानाचा प्रत्यक्ष संशोधनाशी संबंध जोडून शैक्षणिक प्रकल्प व भविष्यातील संशोधनासाठी संशोधन आणि सांख्यिकीय संकल्पनांचा प्रभावी वापर करण्याचे व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले.

मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार 'पदवी अभ्यासक्रमांच्या क्रेडिट संरचनेतील सर्व सहा उभ्या प्रवाहांअंतर्गत अभ्यासक्रम/विषय निवडीसंदर्भात मार्गदर्शन' या विषयावर मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. NEP २०२० व शासकीय नियमांनुसार अभ्यासक्रम व विषय निवड, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, क्रेडिट संरचनेची प्रभावी अंमलबजावणी आणि महाविद्यालयांच्या शंकांचे निरसन हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्ज्वलन, राष्ट्रगान, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. (सीए) रवींद्र बांबार्डेकर, डॉ. अनिल सिंग, डॉ. सुचित्रा नाईक, डॉ. सतीश झेंडे यांच्यासह मान्यवरांनी आगामी हिवाळी परीक्षा, परीक्षा पद्धती व शैक्षणिक मार्गदर्शक तत्त्वांबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेत अभ्यासक्रम निवड, कागदपत्र पडताळणी व पुनरावलोकन समितीसोबत संवाद सत्र घेण्यात आले. या कार्यशाळेत ८४ महाविद्यालये तसेच २१७ प्राध्यापक सहभागी झाले होते. या कार्यशाळेमुळे NEP २०२० आधारित पदवी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण व एकसमान पद्धतीने करण्यासाठी सहभागी महाविद्यालयांना मार्गदर्शन मिळाले.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

अभ्यास सहल

मानव विज्ञान, नैदानिक मानसशास्त्र, पर्यावरणशास्त्र, तसेच जैवविविधता, वन्यजीव संवर्धन व व्यवस्थापन विभागाच्या सहकार्याने दिनांक ११ ऑगस्ट रोजी ठाणे येथील नमो ग्रँड सेंट्रल पार्क येथे निसर्ग-पर्यावरण भटकंतीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे ३५ विद्यार्थी व ४ प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना निसर्गाशी जवळीक निर्माण करणे, हिरव्या जागांचे महत्त्व आणि जैवविविधतेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांनी

उद्यानातील हिरवाई, विविध नैसर्गिक घटक आणि शांत वातावरणाचा अनुभव घेतला. सजगपणे चालण्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परिसराचे निरीक्षण केले.

वनस्पतीशास्त्र विभागातर्फे द्वितीय आणि तृतीय वर्ष विद्यार्थ्यांनसाठी अभ्यास सहलीचे आयोजन दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी 'नमो ग्रँड सेन्ट्रल पार्क, ठाणे' येथे करण्यात आले. या अभ्यास सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना वनस्पतीची विविधता, जैव विविधता आणि नैसर्गिक परिसंस्थेचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. विद्यार्थ्यांनी उद्यानातील विविध वनस्पतींचे निरीक्षण करून त्यांच्या वैशिष्ट्यांची माहिती घेतली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वनस्पतींचे पर्यावरणीय महत्त्व, संवर्धन आणि जैवविविधतेतील योगदान याबाबत मार्गदर्शन केले.

शिक्षकांचे यश –

प्राणीशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. निलेश जवळकर यांचा Springer Nature प्रकाशित International Journal of Tropical Insect Science या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात Insecticidal efficacy, induced morphological and histopathological alterations in Heliothis armigera (Hbner) exposed to Nerium oleander leaf extracts हा संशोधन लेख प्रकाशित झाला.

पालक–शिक्षक सभा –

वनस्पतिशास्त्र विभागातर्फे दिनांक १८ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता वनस्पतिशास्त्र प्रयोगशाळेत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक–शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे, त्यांच्या अभ्यासातील अडचणी जाणून घेणे तसेच पालक व शिक्षक यांच्यात प्रभावी संवाद साधणे हा सभेचा प्रमुख उद्देश होता. सभेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक कामगिरी, अभ्यासातील सातत्य आणि सर्वांगीण विकास याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षकांनी नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याबाबत मार्गदर्शन केले. पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक सूचना व सहकार्य व्यक्त केले. सभा सकारात्मक व उत्स्फूर्त वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली.

ग्रंथालय विभाग –

ग्रंथालय विभागातर्फे दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती तसेच विद्या प्रसारक मंडळाचा ९१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे, तसेच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याचे स्मरण करण्यात आले.

क्रांतिसिंह नाना पाटील जयंती

ग्रंथालय विभागातर्फे दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, देशभक्ती, सामाजिक कार्य आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वपूर्ण भूमिकेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

राष्ट्रीय ग्रंथपाल दिन

ग्रंथालय विभागातर्फे दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून शब्दकोश प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. एस.

आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. डॉ. रंगनाथन यांच्या भारतीय ग्रंथालय-शास्त्रातील योगदानाची, तसेच ग्रंथालय क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती प्रदर्शित करण्यात आली होती. या प्रदर्शनामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी तसेच विविध विज्ञान विषयावरील शब्दकोश ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र असे एकूण ६५ शब्दकोश प्रदर्शित करण्यात आले. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना संदर्भग्रंथांचा प्रभावी वापर, नवीन शब्दांचा अर्थ शोधणे आणि अभ्यासासाठी शब्दकोशाचे महत्त्व यांची माहिती मिळाली. वनस्पतिशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. उर्मिला कुमावत यांनी शब्दकोशाचे महत्त्व मुलांना पटवून दिले. या शब्दकोश प्रदर्शनाला २०१ विद्यार्थ्यांनी भेट दिली.

राष्ट्रीय क्रीडा दिन

दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडाविषयक विविध विषयांवर पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

ई-संसाधन मार्गदर्शन सत्र

ग्रंथालय विभागातर्फे दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान आणि संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांकरिता ई- संसाधन मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रासाठी सौ. कादंबरी मांजरेकर आणि कु. सुप्रिया भुक्तारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना ई-पुस्तके, ई-जर्नल्स, ऑनलाइन डेटाबेस व विविध डिजिटल शैक्षणिक साधनांची माहिती देण्यात आली. तसेच ई-संसाधनांचा प्रभावी वापर, माहिती शोधण्याच्या पद्धती आणि अभ्यास व संशोधनासाठी त्यांचा उपयोग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या सत्राला १५७ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१ ऑगस्ट विद्या प्रसारक मंडळ ९१ वा स्थापना दिन:

दिनांक १ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. विधी महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी अहवाल सादर केला. विधी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



एलएल.एम : एलएल.एम सत्र ४ च्या विद्यार्थ्यांचा ३ आणि ४ ऑगस्ट २०२६ रोजी सराव मौखिक परीक्षा (Mock Viva) घेण्यात आल्या तसेच ७ आणि ८ ऑगस्ट रोजी मौखिक परीक्षा (Viva) घेण्यात आल्या.

५ ऑगस्ट २०२६ रोजी एलएल.एम सत्र - १ चे वर्ग सुरू झाले.

महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. रुपाली जामोदे ह्यांची सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका प्रेरणा वसावे यांची विधी सहाय्यता कक्षात सहाय्यक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महाविद्यालयात २० ते २२ ऑगस्ट २०२६ रोजी विधी प्रथम वर्ष प्रवेश फेरी - १ दरम्यान ११२ प्रवेश झाले आहेत तसेच ३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२६ विधी प्रथम वर्ष प्रवेश फेरी - २ आहे.

विधी द्वितीय वर्षाचे वर्ग –

महाविद्यालयात विधी द्वितीय वर्षाचे 'A' आणि 'B' तुकडीचे वर्ग ६ ऑगस्ट २०२६ पासून, तर 'C', 'D' आणि 'E' तुकडीचे वर्ग १० ऑगस्ट २०२६ पासून सुरू झाले.

महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा

१२ ऑगस्ट २०२६: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे आणि विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिन महाविद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात राष्ट्रनिर्मिती आणि जागतिक विकासामध्ये युवकांची भूमिका व जबाबदारी या विषयावर विशेष चर्चा करण्यात आली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनोद एच. वाघ यांनी विषयाची सुरुवात करताना युवकांचे राष्ट्राच्या, तसेच जागतिक प्रगतीतील महत्त्व अधोरेखित केले. यावेळी जनरेशन-झेड (Gen-Z) आणि जनरेशन-अल्फा (Gen Alpha) या नव्या पिढ्यांच्या संकल्पनांवर तसेच त्यांच्या बुद्धिमत्ता, सर्जनशीलता, तंत्रज्ञानातील प्रावीण्य आणि समाजातील बदलत्या भूमिकेवर चर्चा करण्यात आली. युवकांनी आपल्या क्षमतांचा सकारात्मक उपयोग करून शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेषाला अधिक प्राधान्य द्यावे, तसेच भारत आणि जगाच्या कल्याणासाठी योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. विनोद वाघ यांनी केले.

कार्यक्रमात अवधूत वीरकर यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि युवा दिनाच्या निमित्ताने युवकांची सामाजिक भूमिका व जबाबदारी याबाबत आपले विचार मांडले. महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना कायदेविषयक जनजागृतीच्या उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच गरीब, गरजू आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेविषयक मदत व जनजागृतीच्या माध्यमातून योगदान देण्याचे आवाहनही करण्यात आले. युवकांनी जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे, या संदेशाने आंतरराष्ट्रीय युवा दिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



महाविद्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

महाविद्यालयात देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, तसेच तिरंगा ध्वजाबद्दल आदर आणि अभिमानाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा तसेच रील मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या दोन्ही स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य, राष्ट्रनिर्मिती, देशाची लोकशाही मूल्ये आणि नागरिकांची कर्तव्ये यांसारख्या विषयांवर आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली. तर रील मेकिंग स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आधुनिक डिजिटल माध्यमांचा सर्जनशील वापर करून देशभक्तीची भावना व्यक्त केली.

वक्तृत्व स्पर्धा		रील मेकिंग स्पर्धा	
बक्षीस	**नाव**	**बक्षीस**	**नाव**
प्रथम	सनील गवई	प्रथम	कोमल सजेखर
दुसरा	अनिकेत जाधव	दुसरा	श्रद्धा म्हात्रे
तिसरा	उज्ज्वला म्हस्के	तिसरा	मृणाली पाटील, प्रतिमा प्रीती राहुल

दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जया कुमार यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या तिरंगा यात्रेत महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. तिरंगा यात्रेमुळे संपूर्ण महाविद्यालय परिसरात देशभक्तीपूर्ण वातावरण निर्माण झाले.

यावेळी 'हर घर तिरंगा' अभियानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्रध्वजाबद्दल आदराची भावना असणे आणि राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्राचार्या डॉ. श्रीविद्या जया कुमार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक तिरंगा ध्वज प्रदान करण्यात आला. तसेच राष्ट्रध्वजाच्या सन्मानाशी संबंधित नियम व ध्वजसंहितेबाबत विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती देण्यात आली. राष्ट्रध्वजाचा योग्य पद्धतीने वापर, त्याचा सन्मान आणि त्यामागील राष्ट्रीय भावना याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. या विविध उपक्रमांमुळे स्वातंत्र्यदिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदार नागरिकत्व यांची जाणीव करून देणारा उपक्रम ठरला.




दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली आणि उपस्थितांनी राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा व सार्वभौमत्वाचा गौरवपूर्ण स्मरण केला. संपूर्ण स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयात उत्साह, शिस्त आणि देशभक्तीचे वातावरण पाहायला मिळाले. विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहिल्याने स्वातंत्र्यदिनाचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रीय बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांप्रती आदर निर्माण करण्याच्या दृष्टीने हे आयोजन महत्त्वपूर्ण ठरले. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या तीन दिवसीय स्वातंत्र्यदिन उपक्रमांमधून राष्ट्रध्वजाचा सन्मान, देशप्रेम आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे महाविद्यालयाच्या परिसरात स्वातंत्र्यदिनाचा उत्सव अधिक अर्थपूर्ण आणि संस्मरणीय ठरला.

आपत्ती व्यवस्थापन परीक्षा व मौखिक (VIVA) परीक्षा:

आपत्ती व्यवस्थापन विषयाची परीक्षा व मौखिक (VIVA) परीक्षा १४ ऑगस्ट २०२६ रोजी घेण्यात आली तसेच आपत्ती व्यवस्थापन परीक्षेचा निकाल ३१ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर करण्यात आला.

बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या सोशल मीडिया मार्गदर्शक तत्त्वांसाठी नियुक्ती

महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापक श्री. शिवाजी बिबे यांची बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या

सोशल मीडिया मार्गदर्शक तत्त्वांसाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

आपत्ती व्यवस्थापन समितीची नियुक्ती

महाविद्यालयाच्या सहायक प्राध्यापिका श्रीमती कृष्णा कामत यांची आपत्ती व्यवस्थापन समितीच्या सदस्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

डास प्रतिबंधात्मक फॉगिंग व फ्युमिगेशन मोहीम

महाविद्यालयाच्या विनंतीनुसार २० ऑगस्ट २०२६ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात वाढत्या डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फॉगिंग व फ्युमिगेशनची कार्यवाही करण्यात आली.

आजीवन अध्ययन व विस्तारविभाग (DLLE) यांच्या वतीने ग्राहक संरक्षण आणि RERA विषयावरील कार्यशाळा

महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (DLLE) यांच्या वतीने २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायं. ५:०० ते ७:०० या वेळेत प्रथम भेट कार्यक्रम व ग्राहक संरक्षण आणि RERA विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांमध्ये ग्राहकांचे हक्क, ग्राहक संरक्षण कायदा, रिअल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) अधिनियम, २०१६ (RERA) तसेच सदनिका व रिअल इस्टेट व्यवहारांशी संबंधित उपलब्ध कायदेशीर उपाययोजनांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या उद्घाटनपर मनोगताने झाली. त्यांनी उपस्थित मान्यवर, प्रमुख वक्ते, प्राध्यापकवर्ग, DLLE समन्वयक आणि विद्यार्थी यांचे स्वागत केले. आपल्या मनोगतात त्यांनी कायदेविषयक जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांनी कायद्याचे सैद्धांतिक ज्ञान प्रत्यक्ष सामाजिक समस्यांशी जोडून पाहावे आणि विस्तार कार्यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. कार्यशाळेसाठी डॉ. अरुण रामचंद्र गायकवाड, अध्यक्ष, ग्राहक आयोग, पुणे हे प्रमुखवक्ते व संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. डॉ. गायकवाड यांनी ग्राहक संरक्षण, ग्राहकांचे हक्क आणि RERA या विषयांवर सविस्तर व मार्गदर्शक स्वरूपाचे व्याख्यान दिले. विशेषतः सदनिका खरेदीदार, घर खरेदीदार, बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्यात उद्भवणाऱ्या वादांच्या संदर्भात त्यांनी महत्त्वपूर्ण कायदेशीर व व्यावहारिक बाबी स्पष्ट केल्या. कार्यशाळेत पुढील महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले:

१. ग्राहकाचा अर्थ – वक्त्यांनी 'ग्राहक' या संकल्पनेचा कायदेशीर अर्थ स्पष्ट केला. तसेच कोणत्या परिस्थितीत व्यक्ती ग्राहक आयोगाकडे तक्रार करून योग्य कायदेशीर दिलासा मागू शकते, याबाबत मार्गदर्शन केले.

२. ग्राहकांचे हक्क व ग्राहक संरक्षण – विद्यार्थ्यांना ग्राहकांचे महत्त्वपूर्ण हक्क, ग्राहक संरक्षण कायद्याचे महत्त्व, तसेच अनुचित व्यापार पद्धती आणि सेवांमधील त्रुटींविरुद्ध उपलब्ध कायदेशीर संरक्षण यांची माहिती देण्यात आली.

३. RERA ची ओळख – रिअल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) अधिनियम, २०१६ (RERA) याची उद्दिष्टे, महत्त्व आणि रिअल इस्टेट क्षेत्राचे नियमन करण्यातील त्याची भूमिकाल याबाबत माहिती देण्यात आली. तसेच घरखरेदीदारांच्या हितसंरक्षणाच्या दृष्टीने RERA चे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

४. RERA आणि सदनिका खरेदीदार – सदनिका खरेदीदार व घरखरेदीदारांना विकासक किंवा बांधकाम व्यावसायिकांशी संबंधित वादांच्या परिस्थितीत उपलब्ध असलेले हक्क व कायदेशीर उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

५. ग्राहक आयोग आणि RERA अंतर्गत उपलब्ध उपाय – घरखरेदीदारांना ग्राहक संरक्षण कायदा आणि RERA अंतर्गत उपलब्ध असलेल्या विविध कायदेशीर उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

६. RERA व ग्राहक संरक्षण कायद्यानुसार कार्यवाहीतील फरक – कार्यशाळेतील एक महत्त्वाचा विषय म्हणजे RERA अंतर्गत कार्यवाही आणि ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राहक आयोगासमोर दाखल करण्यात येणाऱ्या तक्रारीतील फरक. सदनिकेशी संबंधित वाद, ताबा देण्यास होणारा विलंब, सेवांमधील त्रुटी आणि विकासकांविरुद्धच्या इतर तक्रारींच्या संदर्भात कोणत्या प्रकारचे कायदेशीर उपाय उपलब्ध होऊ शकतात, याबाबत डॉ. गायकवाड यांनी व्यावहारिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले.

७. सदनिका खरेदीदारांना भेडसावणाऱ्या समस्या – वक्त्यांनी घरखरेदीदार व ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध व्यावहारिक समस्यांवर प्रकाश टाकला. त्यामध्ये प्रामुख्याने: सदनिकेचा ताबा देण्यास होणारा विलंब; सेवांमधील त्रुटी; करारातील अटी व शर्तींबाबतचे वाद; आश्वासन दिलेल्या सुविधा व सोयी उपलब्ध न होणे; सदनिकेच्या ताब्याशी व पूर्णत्वाशी संबंधित समस्या; बांधकाम व्यावसायिक किंवा विकासकांकडून होणाऱ्या अनुचित पद्धती; आणि रिअल इस्टेट व्यवहारांमधून निर्माण होणाऱ्या इतर कायदेशीर व व्यावहारिक अडचणी यांचा समावेश होता.

८. व्यावहारिक कायदेविषयक जनजागृती – विद्यार्थ्यांना कोणत्याही वादाच्या परिस्थितीत संबंधित कायदेशीर तरतुदी, अधिकारक्षेत्र आणि उपलब्ध कायदेशीर उपाय यांचा योग्य प्रकारे अभ्यास करूनच योग्य मंच किंवा प्राधिकरणाकडे दाद मागण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

९. कायदेशीर कागदपत्रांचे महत्त्व – रिअल इस्टेट व्यवहार आणि ग्राहकविषयक वादांच्या संदर्भात करारपत्रे, पावत्या, पत्रव्यवहार, संबंधित कागदपत्रे आणि इतर पुरावे सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व वक्त्यांनी स्पष्ट केले.

१०. संवादात्मक व व्यावहारिक अध्ययन – कार्यशाळे-दरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील कायदेशीर प्रश्न व उदाहरणांच्या माध्यमातून ग्राहक कायदा आणि RERA यांचा व्यावहारिक उपयोग समजून घेण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कायदेविषयक ज्ञानात, तसेच व्यावहारिक समजुतीत भर पडली.

DLLE विषयी मार्गदर्शन डॉ. चांदणी व्ही. घोगरे, DLLE समन्वयक, यांनी विद्यार्थ्यांना आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (DLLE) याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी DLLE ची उद्दिष्टे, विविध उपक्रम आणि विस्तार कार्यातील विद्यार्थ्यांची भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांनी सामाजिक जनजागृती, समुदायाभिमुख उपक्रम आणि विविध विस्तार कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या कायदेविषयक ज्ञानाचा उपयोग समाजामध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण करण्यासाठी करावा, असे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थी DLLE समन्वयकाची ओळख कार्यक्रमा-दरम्यान विद्यार्थी DLLE समन्वयक श्री. सचिन अहिरे यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. DLLE शी संबंधित विद्यार्थी उपक्रमांचे समन्वयन करणे, तसेच विद्यार्थी व विभाग यांच्यात प्रभावी समन्वय साधणे याबाबत त्यांच्या भूमिकेची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन DLLE सहभागी विद्यार्थी श्री. कल्पेश निकुंभ यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचे विविध टप्पे शिस्तबद्ध व प्रभावी पद्धतीने पार पाडत कार्यक्रमाचा सुरळीत प्रवाह कायम ठेवला. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. सुनील गवई यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रमुख वक्ते डॉ. अरुण रामचंद्र गायकवाड, DLLE समन्वयक डॉ. चांदणी व्ही. घोगरे, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी DLLE

समन्वयक, विद्यार्थी सहभागी, तसेच कार्यक्रमाच्या आयोजनास सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. या प्रथम भेट कार्यक्रम व कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना पुढील बाबींचे ज्ञान व मार्गदर्शन मिळाले.

ग्राहकांचे हक्क आणि ग्राहक संरक्षण याबाबत जागरूकता निर्माण झाली. RERA आणि त्याच्या उद्दिष्टांची माहिती मिळाली. सदनिका खरेदीदार व घरखरेदीदारांच्या हक्कांची माहिती मिळाली. रिअल इस्टेट व्यवहारांमध्ये उद्भवणाऱ्या विविध समस्यांची माहिती मिळाली. RERA आणि ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत उपलब्ध कायदेशीर उपायांमधील फरक समजून घेण्यास मदत झाली. ग्राहक व रिअल इस्टेट विषयक वादांमध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे महत्त्व समजले. DLLE ची उद्दिष्टे व विविध विस्तार उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि कायदेविषयक जनजागृतीच्या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा निर्माण झाली. VPM'S TMC LAW COLLEGE, THANE - Department of Lifelong Learning and Extension (आजीवन अध्ययन व विस्तार विभाग) (DLLE) यांच्या वतीने आयोजित

करण्यात आलेला प्रथम भेट कार्यक्रम व ग्राहक संरक्षण आणि RERA विषयावरील कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना ग्राहक संरक्षण, ग्राहकांचे हक्क, RERA, सदनिका खरेदीदारांचे हक्क तसेच रिअल इस्टेट वादांमधील उपलब्ध कायदेशीर उपाय याबाबत महत्त्वपूर्ण व्यावहारिक ज्ञान मिळाले. तसेच DLLE च्या माध्यमातून सामाजिक जनजागृती व विस्तार कार्यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली.

२९ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयात 'स्थावर मालमत्ता कायदा' या विषयातील अतिरिक्त प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले.

विद्या प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय

''ऊर्जाव्हिजन २०२६ – 'ऑन द स्पॉट' पोस्टर निर्मिती स्पर्धा'' – (२० ऑगस्ट २०२६)

महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने 'अक्षय ऊर्जा दिवस' (राष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा दिवस) साजरा करण्याच्या निमित्ताने २० ऑगस्ट २०२६ रोजी 'ऊर्जा-व्हिजन २०२६' (URJAVISION २०२६) – 'ऑन-द-स्पॉट' पोस्टर निर्मिती स्पर्धेचे आयोजन केले होते. भारतात दरवर्षी २० ऑगस्ट रोजी 'अक्षय ऊर्जा दिवस' किंवा 'राष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा दिवस' साजरा केला जातो. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने (MNRE) २००४ मध्ये सुरू केलेला हा दिवस माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती म्हणून साजरा केला जातो आणि त्यासोबतच सौर, पवन, बायोमास व जलविद्युत यांसारख्या स्वच्छ ऊर्जा स्रोतांचा वापर करण्यास प्रोत्साहन देतो. विद्यार्थ्यांमध्ये नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत विकास, ऊर्जा साठवणूक, स्मार्ट ग्रिड्स आणि स्वच्छ ऊर्जेच्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांच्यातील सर्जनशीलता व तांत्रिक संवाद कौशल्याला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाचे संयोजन सौ. ऋजुता कांबळी यांनी केले. या स्पर्धेत एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा 'ऑन-द-स्पॉट' पोस्टर निर्मितीच्या स्वरूपात आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना विषय देण्यात आला आणि त्यांना ३० मिनिटांच्या मर्यादित वेळेत संकल्पना मांडून पोस्टर तयार करायचे होते. 'कॅनव्हा' (Canva) या साधनाद्वारे ही पोस्टर्स डिजिटल पद्धतीने तयार करण्यात आली; यामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक माहितीचे जलद गतीने संशोधन, नियोजन व दृश्यरूप (व्हिज्युअलायझेशन) करणे

आणि ती माहिती आकर्षक व माहितीपूर्ण पद्धतीने सादर करणे यांसारखी कौशल्ये प्रदर्शित करण्याची संधी मिळाली. स्पर्धेसाठीच्या संभाव्य विषयांमध्ये अक्षय ऊर्जेचा (renewable energy) समावेश, प्रगत ऊर्जा साठवणूक प्रणाली, 'नेट-झिरो' भविष्यासाठी अक्षय ऊर्जा, स्मार्ट ग्रिड्स, हायब्रिड अक्षय ऊर्जा प्रणाली, हरित हायड्रोजन, बॅटरी व्यवस्थापन प्रणाली आणि अक्षय ऊर्जेवर आधारित मायक्रो-गिड्स यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळेत त्यांना नेमून दिलेल्या विषयांचे प्रभावी आणि आकर्षक पोस्टर्समध्ये यशस्वीरीत्या रूपांतर केले.

या कार्यक्रमाचे परीक्षण श्री. वानखेडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सर्जनशीलता, तांत्रिक आकलन, डिजिटल डिझायनिंग कौशल्ये आणि वेळेचे व्यवस्थापन यांचे प्रदर्शन केले. 'ऑन द स्पॉट पोस्टर मेकिंग स्पर्धेचे' विजेते पुढीलप्रमाणे आहेत:

- प्रथम पारितोषिक: आर्यन प्रकाश खेडेकर आणि पार्थ रोकडे - TYEE
- द्वितीय पारितोषिक: स्वयम बोबडे आणि यश साप्ते - SEEE
- तृतीय पारितोषिक: वैदेही पिंगळे, मंथन राणे, अथर्व साळगावकर, स्नेहल महाडिक आणि फाल्गुनी यादव - TYEE

'अक्षय ऊर्जा दिवस' (Akshay Urja Diwas) साजरा करण्याचा एक भाग म्हणून, विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे 'ऊर्जाव्हिजन २०२६' (URJAVISION 2026) - 'ऑन-द-स्पॉट' पोस्टर निर्मिती स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग आणि अवघ्या ३० मिनिटांत तयार केलेल्या पोस्टर्सचा उच्च दर्जा यांतून त्यांची सर्जनशीलता, तांत्रिक जागरूकता आणि वेळेच्या आव्हानात्मक मर्यादेत प्रभावीपणे काम करण्याची क्षमता दिसून आली. हा कार्यक्रम अक्षय ऊर्जेबाबत जागरूकता पसरवण्यासाठी आणि शाश्वत ऊर्जेच्या भविष्याबाबत नावीन्यपूर्ण विचार करण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरला.

एम्बेडेड सिस्टम डिझाइन प्रशिक्षण कार्यक्रम

(22nd to 23rd and 29th to 31st August 2026)

महाविद्यालयातील 'इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभाग' आणि 'प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग' (Training Placement Cell) यांच्या संयुक्त विद्यमाने, २२-२३ ऑगस्ट आणि २९-३१ ऑगस्ट २०२६ अशा पाच दिवसांच्या कालावधीत 'एम्बेडेड सिस्टम डिझाइन' (Embedded System Design) या विषयावर ३० तासांचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना एम्बेडेड सिस्टम्सचे मूलभूत व व्यावहारिक ज्ञान तसेच त्यांचे प्रत्यक्ष क्षेत्रातील (real-world) उपयोग समजावून सांगण्याच्या उद्देशाने, हा उपक्रम प्रत्यक्ष कृतीवर आधारित (hands-on) आणि उद्योगांच्या गरजांशी सुसंगत अशा प्रकारे आखण्यात आला होता.

हे प्रशिक्षण 'नॅशनल नेक्स्ट-जेन ऑटोमेशन अँड ईव्ही अपस्किल सोल्युशन्स'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) श्री. प्रसाद कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले; त्यांनीच प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आणि संपूर्ण सत्रांदरम्यान तज्ज्ञ मार्गदर्शन केले. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागाच्या प्रमुख (HOD) सौ. आर. यू. पाटील यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली, प्रशिक्षण कार्यक्रम समन्वयक सौ. ऋजुता कांबळी आणि टीपीओ (TPO) समन्वयक सौ. सुरभी श्रॉफ यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

या प्रशिक्षणात एम्बेडेड-सिस्टम डिझाइनच्या महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश होता, ज्याची सुरुवात अर्डुइनो (Arduino) प्रोग्रामिंग आणि बेसिक इंटरफेसिंगने झाली. विद्यार्थ्यांना एलईडी, पुश बटन्स, बझर्स आणि स्विचेसच्या उपयोगांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. त्यानंतर या कार्यक्रमात सेन्सर इंटरफेसिंगची ओळख करून देण्यात

आली, ज्यामध्ये DHT11 तापमान आणि आर्द्रता सेन्सर्स, टच सेन्सर, फ्लेम सेन्सर्स आणि चट-सिरीज गॅस सेन्सर्स यांचा समावेश होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मॉनिटरिंग आणि अलार्म सिस्टीममध्ये सेन्सर्स कसे एकत्रित केले जातात हे समजण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांनी डिस्प्ले डिव्हाइसेस आणि UART, SPI व I2C यांसारख्या कम्युनिकेशन प्रोटोकॉल्सची माहिती घेतली, तसेच LCD आणि OLED डिस्प्लेच्या प्रत्यक्ष इंटरफेसिंगचा अनुभवही घेतला. 'मोटर कंट्रोल आणि क्ट्युएटर्स' या मॉड्यूलद्वारे त्यांना सर्वोमोटर्स, अल्ट्रासोनिक सेन्सर्स, DC मोटर्स, L298N मोटर ड्रायव्हर्स आणि PWM-आधारित वेगनियंत्रण (speed control) यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना RFID आणि रिले-आधारित ऑटोमेशनची ओळख करून देण्यात आली; यामध्ये RFID टॅगरीडिंग, क्सेस कंट्रोल सिस्टम्स आणि घरगुती उपकरणांचे नियंत्रण यांसारख्या गोष्टींचा समावेश होता.

अंतिम मॉड्यूल ESP32 आणि IoT प्लिकेशन्सवर केंद्रित होते; यामध्ये विद्यार्थ्यांनी ESP32 प्रोग्रामिंग, वाय-फाय कनेक्टिव्हिटी, IoT डॅशबोर्ड्स आणि स्मार्ट होमकंट्रोल या गोष्टींचा अभ्यास केला. या कार्यक्रमाच्या प्रात्यक्षिक स्वरूपामुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक संकल्पनांची प्रत्यक्ष हार्डवेअर अंमलबजावणीशी सांगड घालण्यास मदत झाली, तसेच प्रोग्रामिंग, सर्किट इंटरफेसिंग, ट्रबल शूटिंग आणि ऑटोमेशन यांमधील कौशल्ये विकसित करता आली.

या प्रशिक्षणात ऑटोमेशन आणि रोबोटिक्स तसेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना एम्बेडेड सिस्टम्स, रोबोटिक्स, ऑटोमेशन आणि आयओटी (IoT) तंत्रज्ञानाबाबत उद्योगाच्या दृष्टीने उपयुक्त असा अनुभव यशस्वीपणे मिळाला. तसेच या तंत्रज्ञानांचे प्रत्यक्ष उपयोजन आणि सध्याच्या व भविष्यातील करिअरच्या संधींच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व समजून घेण्यासही विद्यार्थ्यांना मदत झाली.

एकंदरीत, 'एम्बेडेड सिस्टम डिझाइन' प्रशिक्षण कार्यक्रम हा एक मौल्यवान आणि ज्ञानवर्धक अनुभव ठरला. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रत्यक्षकृतीवर आधारित सत्रे (हँड्स-ऑनप्रॅक्टिकल्स) आणि प्रत्यक्ष व्यवहारातील उपयोगांचा मेळ्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची तांत्रिक कौशल्ये आणि एम्बेडेड-सिस्टम विकासातील आत्मविश्वास वाढवण्यास मदत झाली. या उपक्रमाने शैक्षणिक शिक्षण आणि उद्योगांच्या गरजा यांमधील दरी सांधण्याच्या दिशेने यशस्वी योगदान दिले आणि प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्यावर सहभागींना सहभागाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

एम्बेडेड सिस्टम डिझाइन प्रशिक्षण कार्यक्रमाची काही झलक :



उपक्रमाचा विषय / शीर्षक:

कॅम्पस ते कॉर्पोरेट सज्जता - डिजिटल परिवर्तन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानआणि द इंटेलिजन्स डिझायनर या विषयांवरील अतिथी व्याख्यान.

कार्यपद्धती : ऑफलाइन

दिनांक आणि वेळ / कालावधी :

२५ ऑगस्ट २०२६, दुपारी १:३० पासून

स्थळ : थोरले बाजीराव पेशवे सभागृह व्हीपीएम अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे

आयोजक विभाग : प्रशिक्षण आणि नियुक्ती कक्ष

समन्वयक : श्रीमती सुरभी आर. श्रॉफ (विद्युत विभाग)

वक्ते : श्री. जोजू जॉर्ज वर्गीस आणि डॉ. जिमी जैन

वक्त्यांचे पद/ओळख :

जोजी जॉर्ज वर्गीस – आयटी (IT) व्यावसायिक

डॉ. जिमी जैन – सीईओ, आत्मन स्फेअर, मुंबई

वक्त्याचा/वक्त्यांचा पत्ता : मुंबई

सहभागी झालेले : विद्यार्थी आणि प्राध्यापक

सहभागींची संख्या : विद्यार्थी – १५०, प्राध्यापक – १५

विषय / उपक्रमाचा थोडक्यात तपशील:

VPMCOE च्या प्रशिक्षण आणि नियुक्ती कक्ष विभागाने सर्व शाखांमधील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दोन माहितीपूर्ण व्याख्याने आयोजित केली होती. कॅम्पस (महाविद्यालयीन शिक्षण) ते कॉर्पोरेट जगतातील या स्थित्यंतरासाठी विद्यार्थ्यांना सज्ज करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या सत्रांमध्ये उदयोन्मुख तंत्रज्ञान, डिजिटल परिवर्तन, नावीन्यपूर्णता आणि आजच्या वेगाने बदलणाऱ्या व्यावसायिक वातावरणात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला.

खालील विषयांवर दोन सत्रे आयोजित करण्यात आली होती :

१. कॅम्पस ते कॉर्पोरेट सज्जता – डिजिटल परिवर्तन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान
२. द इंटेलिजन्स डिझायनर

या सत्रांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील सध्याच्या प्रवाहांची ओळख झाली आणि त्यांना पारंपरिक शैक्षणिक अभ्यासाच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास प्रोत्साहन मिळाले.

VPMCOE च्या TPO सेल समन्वयक, सुश्री सुरभी श्रॉफ यांच्या स्वागतपर भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांनी वक्ते, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे स्वागत केले; तसेच अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी उद्योगकेंद्रित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या अपेक्षा यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक ज्ञान सतत अद्ययावत ठेवावे, व्यावसायिक कौशल्ये विकसित करावीत आणि उद्योन्मुख तंत्रज्ञानाबाबत जागरूक राहावे, यावर तिने भर दिला.

सत्र १ – कॅम्पस ते कॉर्पोरेट सज्जता : डिजिटल परिवर्तन आणि उद्योन्मुख तंत्रज्ञान

पहिले सत्र श्री. जोजी वर्गीस यांनी घेतले; त्यांनी विद्यार्थ्यांना 'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन' (डिजिटल परिवर्तन) ही संकल्पना आणि विविध क्षेत्रांमधील त्याचे वाढते महत्त्व यांबाबत माहिती दिली.

या सत्रातून विद्यार्थ्यांना अशा अनेक उद्योन्मुख तंत्रज्ञानांची ओळख करून देण्यात आली, जी व्यवसायांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणत आहेत आणि करिअरच्या नवीन संधी निर्माण करत आहेत.

चर्चा केलेल्या प्रमुख विषयांमध्ये यांचा समावेश होता:

* ब्लॉकचेन तंत्रज्ञान : वक्त्यांनी ब्लॉकचेनची मूलभूत संकल्पना आणि सुरक्षित, पारदर्शक व विकेंद्रित डिजिटल व्यवहार करण्यामध्ये त्याचा होणारा वापर यांबाबत माहिती दिली.
* AR/VR (ऑगमेंटेड रिअलिटी आणि व्हर्च्युअल रिअलिटी) : शिक्षण, प्रशिक्षण, मनोरंजन, अभियांत्रिकी आणि उद्योग यांसारख्या क्षेत्रांमध्ये AR आणि VR चा वापर कसा केला जातो, याची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली.

* बिग डेटा : आजच्या डिजिटल युगात मोठ्या प्रमाणात डेटा कसा निर्माण होतो आणि निर्णय प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी तसेच व्यवसायाची कामगिरी सुधारण्यासाठी संस्था कशा प्रकारे डेटा विश्लेषणाचा वापर करतात, हे वक्त्यांनी स्पष्ट केले.
* उद्योन्मुख तंत्रज्ञान : या सत्राद्वारे विद्यार्थ्यांना सतत शिकत राहण्याचे आणि तांत्रिक प्रगतीनुसार स्वत:ला जुळवून घेण्याचे महत्त्व समजून घेण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

हे व्याख्यान माहितीपूर्ण होते आणि त्यातून विद्यार्थ्यांना हे समजण्यास मदत झाली की, उद्योन्मुख तंत्रज्ञान कशा प्रकारे नोकऱ्यांचे स्वरूप आणि भविष्यातील अभियंत्यांकडून अपेक्षित असलेली कौशल्ये बदलत आहे.

पहिल्या व्याख्यानाची सांगता प्रश्नोत्तरांच्या संवादात्मक सत्राने झाली. विद्यार्थ्यांनी यात उत्साहाने सहभाग घेतला आणि उद्योन्मुख तंत्रज्ञान, त्यांचे उपयोग, करिअरच्या संधी तसेच कॉर्पोरेट क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी आवश्यक कौशल्ये यांबाबत प्रश्न विचारले.

या संवादामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शंकांचे निरसन करण्याची आणि वक्त्याच्या अनुभवातून व्यावहारिक गोष्टींची माहिती करून घेण्याची संधी मिळाली.

सत्र २ – द इंटेलिजन्स डिझायनर (The Intelligence Designer)

दुसरे सत्र डॉ. जिमी जैन यांनी 'द इंटेलिजन्स डिझायनर' या विषयावर घेतले.

हे सत्र अत्यंत संवादात्मक, उत्साही आणि चैतन्यपूर्ण होते, ज्यामुळे विद्यार्थी संपूर्ण वेळ त्यात सक्रियपणे सहभागी राहिले. डॉ. जिमी जैन यांनी विद्यार्थ्यांना सर्जनशील विचार करण्यास आणि समस्या निवारणासाठी नावीन्यपूर्ण दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहित केले.

आजच्या व्यावसायिक वातावरणात बुद्धिमत्ता, सर्जनशीलता, जुळवून घेण्याची क्षमता आणि निरंतर शिकणे यांचे महत्त्व यावर या सत्रात भर देण्यात आला. केवळ पारंपरिक पद्धतींचे अनुकरण करण्याऐवजी, आव्हानांकडे विविध दृष्टिकोनातून पाहण्यास आणि त्यावर उपाय शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

वक्त्यांची प्रभावी संवादशैली आणि संवादात्मक पद्धतीमुळे शिकण्यासाठी एक उत्साही वातावरण निर्माण झाले. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासात अधिक आत्मविश्वासू, जिज्ञासू, सर्जनशील आणि परिस्थितीशी जुळवून घेणारे बनण्याची प्रेरणा मिळाली.

साध्य झालेले फलित / शिक्षण :

* आधुनिक उद्योगांमध्ये डिजिटल परिवर्तनाचे महत्त्व समजून घेणे.
* ब्लॉकचेन, एआर/व्हीआर आणि बिग डेटा यांसारख्या उद्योन्मुख तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता.
* तंत्रज्ञान कशाप्रकारे करिअरच्या नवीन संधी निर्माण करत आह, हे समजून घेणे.
* सतत शिकण्याचे आणि कौशल्ये वाढवण्याचे महत्त्व जाणणे.
* समस्या सोडवण्यासाठी एक नावीन्यपूर्ण आणि सर्जनशील दृष्टिकोन विकसित करणे.
* कॉर्पोरेट वातावरणात जुळवून घेण्याच्या क्षमतेचे महत्त्व समजून घेणे.
* प्रश्नोत्तर सत्रांच्या माध्यमातून संवाद आणि संप्रेषण सुधारणे. विद्यार्थ्यांना कॅम्पसमधून कॉर्पोरेट जीवनात होणाऱ्या बदलासाठी स्वत:ला तयार करण्यास प्रोत्साहित करणे.

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ ऑगस्ट २०२६ : डॉ. विभूती सावे यांनी लिहिलेला 'सस्टेनेबल ऑपरेशन्स मॅनेजमेंट थ्रू डेटा ड्रिव्हन इन्व्हेंटरी क्लासिफिकेशन अँड मटेरियल रिक्वायरमेंट प्लॅनिंग' या शीर्षकाचा शोधनिबंध स्कोपस अनुक्रमित Q1 श्रेणीतील नियतकालिक – जर्नल ऑफ इंटेलिजेंट डिसिजन मेकिंग अँड इन्फॉर्मेशन सायन्स मध्ये प्रकाशित झाला.

२० ऑगस्ट २०२६ : सर्जनशीलता, डिजिटल कंटेंट निर्मिती आणि सोशल मीडियावरील सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी एमएमएस (MMS) सत्र ३ च्या विद्यार्थ्यांकरिता लाइफ ट ब्रिम्स रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ब्रिम्समधील त्यांचे अनुभव आणि दिनचर्या / जीवनपद्धती दर्शवणारे रील्स तयार केले आणि कॉलेजच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंट, vnbrims, ला टॅग केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कंटेंट निर्मिती, प्रेक्षक सहभाग आणि डिजिटल ब्रँडिंगचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

आयआयसी सदस्या डॉ. योगिता वाघ यांनी या स्पर्धेचे आयोजन केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला आणि सोशल मीडियावर अर्थपूर्ण प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे ब्रिम्सचा चैतन्यमय अनुभव व्यापक समुदायासमोर मांडण्यास मदत झाली.




२१ ऑगस्ट २०२६ : डॉ. योगिता वाघ यांना पॉश कायदा २०१३ आणि यूजीसी कायदा २०१५ वरील प्रशिक्षणासाठी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

२५ ऑगस्ट २०२६ : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आय आय सी (IIC) समिती तर्फे इंटर्नशिप निरीक्षणांपासून ते संघटनात्मक नवोन्मेषापर्यंत (From Internship Observations to Organisational Innovation) या संकल्पनेवर आधारित 'इनोसिप २.० – इनोव्हेशन समर इंटर्नशिप प्रोजेक्ट' (InnoSIP 2.0 - Innovation Summer Internship Project) ची दुसरी आवृत्ती यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. समर इंटर्नशिप अहवाल सादर करण्याच्या पारंपरिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन, इनोसिपने व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांना वास्तविक संघटनात्मक आव्हानांचे निरीक्षण करण्यास, त्यांच्या मूळ कारणांचे विश्लेषण करण्यास, व्यवस्थापन संकल्पना लागू करण्यास आणि मोजता येण्याजोग्या परिणामांसह नाविन्यपूर्ण, व्यवहार्य उपाय विकसित करण्यास प्रोत्साहित केले. या उपक्रमात मुंबईच्या मध्य, पश्चिम आणि हार्बर विभागांमधील ९ व्यवस्थापन संस्थांमधून ३५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. मूल्यमापन टप्प्यात प्रत्येक स्पर्धकाला सादरीकरणाची संधी मिळाली, ज्यातून २५ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी १८ अंतिम स्पर्धकांची निवड करण्यात आली. स्पर्धेच्या या महाअंतिम फेरीत; गौरी गोवंदे विजेती ठरली, तर प्रियांका नायक प्रथम उपविजेती आणि शिवानी तोडणकर द्वितीय उपविजेत्या ठरल्या. यासोबतच वित्त, विपणन, मानव संसाधन आणि ऑपरेशन्स व पुरवठा साखळी या विभागांमध्ये सर्वोत्कृष्ट प्रकल्पासाठी पुरस्कारही देण्यात आले. अंतिम फेरीचे मूल्यमापन उद्योग तज्ज्ञ श्री. अपूर्ब सिन्हा आणि श्री. अपूर्व मोडक यांनी केले, त्यांच्या अभ्यासपूर्ण व अनुभवाधारित मार्गदर्शनामुळे या उपक्रमाला उद्योगक्षेत्राशी अधिक सुसंगतता प्राप्त झाली.

आपल्या ज्ञान आणि उद्योग भागीदारांच्या पाठिंब्याने, इनोसिप २.० (InnoSIP २.०) हे डॉ. व्ही. एन. ब्रिम्स (DR VN BRIMS) ची वचनबद्धता दर्शवते की, केवळ संकल्पना न शिकता, सखोल निरीक्षण करणे, चिकित्सकपणे विचार करणे, अर्थपूर्णरीतीने समस्या सोडवणे आणि प्रभाव निर्माण करणे असे व्यवस्थापन

व्यावसायिक तयार करावेत. आयआयसी (IIC) च्या या व्यासपीठाच्या माध्यमातून संकल्पित केल्याप्रमाणे, हा उपक्रम निरीक्षण करा. विश्लेषण करा. नवनिर्मिती करा. प्रभाव पाडा. असा एक शक्तिशाली संदेश दृढ करतो.



२६ ऑगस्ट २०२६ : ब्रिम्सच्या संघाने बीएमए इनोथॉन ६.० मध्ये प्रथम पारितोषिक पटकावले.

ठाण्यातील स्वायत्त व्यवस्थापन अभ्यास संस्था (बी-स्कूल) - डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BRIMS) च्या एमएमएस (MMS) विद्यार्थ्यांनी, प्रतिष्ठित; बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशन (BMA) द्वारे आयोजित 'इनोथॉन ६.०' या नावीन्यपूर्ण मॅनेजमेंट हॅकेथॉनमध्ये विजेतेपद पटकावून आपल्या संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. 'इनोथॉन ६.०' मध्ये सहभागी बी-स्कूल्सनां प्रत्यक्ष कॉर्पोरेट व्यावसायिक समस्या सोडवण्याचे आव्हान दिले जाते. या कार्यक्रमात मुंबईतील विविध व्यवस्थापन संस्थांमधील ३७ संघांनी उत्साहाने सहभाग घेतला होता व सर्व संघांनी गंभीर व्यावसायिक समस्यांवर मात करण्यासाठी नावीन्यपूर्ण आणि व्यवहार्य कल्पना विकसित करण्याची स्पर्धा केली.

डॉ. मयुरा पाटील आणि प्रा. सिद्धेश सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली, एमएमएसचे विद्यार्थी; सोहम विचारे, अवधूत घाग, गौरी गोवंडे आणि प्राची सोनावणे यांचा समावेश असलेल्या ब्रिम्स (BRIMS) संघाने त्यांच्या नावीन्यपूर्ण उपाययोजना, धोरणात्मक विचार आणि प्रभावी सादरीकरणामुळे आपले वेगळेपण सिद्ध केले. या संघाने डेटा मायनिंग, संशोधन, विचारमंथन आणि अहवाल व सादरीकरणे तयार करण्यासाठी चार महिन्यांहून अधिक काळ मेहेनत केली. त्यांच्या कामगिरीने केवळ व्यवसाय व्यवस्थापनातील त्यांचे या विषयाचे ज्ञानच नव्हे, तर प्रभावीपणे सहयोग करण्याची, वेळेचे व्यवस्थापन करण्याची आणि गुंतागुंतीच्या कल्पना स्पष्टपणे मांडण्याची त्यांची क्षमताही अधोरेखित केली.

हे यश ब्रिम्सच्या सर्वांगीण आणि उद्योग-संलग्न शिक्षणावरील भर अधोरेखित करते. अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, संस्थेचे संचालक डॉ. नीतिन जोशी आणि महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी सातत्याने अशा शैक्षणिक संस्कृतीला प्रोत्साहन दिले आहे, ही संस्कृती सिद्धांत आणि सराव यांचा मेळ घालते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक आणि कॉर्पोरेट-सदृश वातावरणात उत्कृष्ट कामगिरी करण्यास सक्षम केले जाते. एनबीए-मान्यताप्राप्त एमएमएस कार्यक्रम देणारी आणि एनएएसीकडून (NAAC) 'ए' ग्रेडने सन्मानित झालेली ब्रिम्स, विद्यार्थ्यांना त्यांची पूर्ण क्षमता ओळखण्यासाठी सतत सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करते.

इनोथॉन ६.० मधील ही मान्यता, या स्पर्धेत ब्रिम्सने गेल्या अनेक वर्षांपासून मिळवलेल्या यशाच्या परंपरेला पुढे नेते. यामध्ये २०१९ मध्ये एसीसी दांडेकर मेमोरियल ट्रॉफी जिंकणे, त्यानंतर २०२३ मध्ये द्वितीय उपविजेतेपद आणि २०२५ मध्ये उपविजेतेपद मिळवण्याचा समावेश आहे. यावेळचे हे यश देखील उद्याच्या व्यावसायिक जगाच्या आव्हानांसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेवर पुन्हा एकदा जोर देते.



•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❋ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
❋ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
❋ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
अशा सुविधांनी युक्त

सभागृहाचे नाव	ठिकाण	आसन क्षमता
थोरले बाजीराव पेशवे सभागृह	महाविद्यालय परिसर	३००
कात्यायन सभागृह	कला/वाणिज्य इमारत	१६०
पातंजली सभागृह	बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत	१६०
पाणिनी सभागृह	डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत	१८०
मनु सभागृह	वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत	२५०

❋ **संपर्क** ❋

कार्यवाह

विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०
Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.